मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

जुलै १९

या अंकांत—

बळवंत गणेश खापर्डे	१४९
वसंत वऱ्हाडपांडे	१५४
वैकुंठ इंगळे	१५५
'चिकित्सक'	१५६
भा. आ. पांढरीपांडे	१५७
भवानीशंकर पंडित	१५८
सौ. सरस्वती सुभेदार	१६४
मधुकर मंगरूळकर	१६५
राजा मंगळवेढेकर	१७०
योगेश्वर अभ्यंकर	१७०
मधुसूदन अनंत चान्सरकर	१७१
संघवार्ता	१७२

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा
विदर्भ साहित्य संघ
विदर्भविषय सारस्वती जयतु

वर्ष	अंक	किंमत
सातवें	चवथा	आठ अ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादक मंडळ :
प्रा. भ. श्री. पंडित
डॉ. मा. गो. देशमुख
प्रा. अ. ना. देशपांडे
श्री. मधुकर मंगरूळकर

संपादक :
वामन चोरघडे

★

पत्रव्यवहाराचा पत्ता :
" युगवाणी " कार्यालय
विदर्भ साहित्य संघ
उत्तर अंबाझरी रोड
धंतोली, नागपूर १.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रीतुकारामांची गुरुपरंपरा

बळवंत गणेश खापर्डे

✳

श्री तुकाराम महाराजांची जवळची गुरुपरंपरा कोणती, ह्याबद्दल प्रश्न नाही. "सत्य गुरुरायें (किंवा पाठभेदः—'सद्गुरुरायें') कृपा मज केली।" ह्या आपल्या प्रसिद्ध अभंगांत श्री तुकारामच स्पष्ट सांगतात कीं—

"राघवचैतन्य, केशवचैतन्य।
सांगितली खूण माळिकेची॥
बाबाजी आपुलें सांगितलें नाम।
मंत्र दिला राम-कृष्ण-हरि॥".

तेव्हा, ही तुकारामांची जवळची गुरुपरंपरा, हें निर्विवादच आहे.

तसेंच, तुकाराममहाराजांची शिष्यीण संत बहिणाबाई हिच्या एका अभंगांतील "केशवचैतन्य, बाबाजीचैतन्य। झालेसे प्रसन्न तुकोबासी॥" हे चरणहि फार प्रख्यात आहेत. तेव्हा, ही त्यांची गुरुपरंपरा.

पण प्रश्न जवळच्या गुरुपरंपरेचा नाही; मूळ गुरुपरंपरेचा आहे.

श्रीतुकोबांच्या व बहिणाबाईच्या ह्या अभंगचरणांतील राघव, केशव, व बाबाजी; ह्या तीन महाराष्ट्रीय नांवांपुढे 'चैतन्य' हा शब्द किंवा ही उपाधि आली तरी कशी, ह्याचें मला नेहमीच फार आश्चर्य वाटत आलें आहे. महाराष्ट्रांतील नेहमीच्या व जुन्या काळापासून चालत आलेल्या रूढीप्रमाणें ह्या तिन्ही नांवांपुढे 'राव' 'पंत' 'जी' असें कांही न येतां,किंवा साधुत्वदर्शक 'बोवा' हीहि उपाधि न येतां,हें "चैतन्य" काय आलें, कसें आलें, कोठून आलें, कां आलें, असे नेहमी प्रश्न पडत; आणि ह्या प्रश्नांचीं उत्तरें मिळालीं पाहिजेत, असें मला अजूनहि वाटतें. आश्चर्याची गोष्ट ही कीं, ह्या तीन नांवांखेरीज उभ्या महाराष्ट्राच्या इतिहासांत दुसऱ्या कोणत्याहि प्राचीन किंवा अर्वाचीन संप्रदायांत किंवा नांवांत ही 'चैतन्य' ही उपाधि कोठेहि आलेली आढळत नाही ! ही खचित विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

बंगालमधील श्रीगौरांगचैतन्यांच्या संप्रदायाशीं कोठे तरी श्रीतुकाराममहाराजांची गुरुपरंपरा जाऊन भिडत असावी, व म्हणूनच त्यांच्या गुरुपरंपरेंतील राघव, केशव, व बाबाजी, ह्या नांवांना 'चैतन्य' ही उपाधि लागली असावी, असा मला ह्याबाबत पहिल्यापासूनच संशय येत असे. म्हणून, ह्या विषयावरील अधिकारी पुरुष म्हणून, कै० गुरुवर्य ल. रा. पांगारकर ह्यांना मी एकदां पत्र लिहून ह्याबाबत विचारलेंहि होतें. पण त्यांचें उत्तर आलें कीं, " मीं आपल्या तुकारामचरित्रांत तुकोबांच्या

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुरुपरंपरेबद्दल जें लिहिलें आहे त्याहून अधिक माहिती उपलब्ध नाहीं .... बंगालच्या चैतन्य संप्रदायाशीं तुकोबांचा कांहीही संबंध जोडतां येणें शक्य नाहीं हें मीं तेथेच दाखविलें आहे." नाशकाहून दि. १७-२-१९३७ इ० ला लिहिलेलें गुरुवर्यांचें हें पत्र माझ्याजवळ अद्यापि आहे.

तसेंच, पुण्याचे प्रसिद्ध विद्वान, संतवाङ्मयाचे फार खोल अभ्यासी, व वारकरी-संप्रदायाचे आजचे एक फार प्रमुख असलेले प्राचार्य शं. वा. तथा सोनोपंत दांडेकर ह्यांनी तत्वज्ञान परिषदेपुढे "महाराष्ट्रीय चैतन्यसंप्रदाय व बंगाली चैतन्यसंप्रदाय" ह्या विषयावर एक संशोधनपूर्ण निबंध वाचला होता. त्यांत त्यांनीहि असेंच दाखविलें होतें की, ह्या दोन संप्रदायांचा काहीहि संबंध नाही. त्यांनी त्या निबंधांत अशी माहिती दिली आहे की, हे तुकोबांच्या गुरुपरंपरेतील महाराष्ट्रीय चैतन्य ओतुरचे राहणारे होते, व त्यांचें आडनांव 'राजर्षि' होतें. केशव चैतन्यांचें चरित्र उपलब्ध आहे. त्याचें एक हस्तलिखित इतिहाससंशोधक कै० बाबासाहेब देशपांड्यांच्या जवळ होतें. तसेंच, प्रा. दांडेकरांचें असेंहि म्हणणें आहे कीं ज्याअर्थी बंगाली चैतन्यसंप्रदाय हा द्वैती आहे, व हा ओतुरचा महाराष्ट्रीय चैतन्य संप्रदाय अद्वैती आहे, त्याअर्थीहि हे दोन संप्रदाय, व त्यांची परंपरा, भिन्नच आहेत.

ह्यापैकी श्री. दांडेकरांचें ह्यांतील प्रारंभींचें ऐतिहासिक विवेचन सर्व मान्य करण्यासारखेंच आहे. पण बंगाली चैतन्य संप्रदाय द्वैती आहे, व महाराष्ट्रीय चैतन्य संप्रदाय अद्वैती आहे म्हणून हे दोन संप्रदाय भिन्न आहेत, असें जें त्यांचें म्हणणें आहे, त्याविषयीं मला काय म्हणावयाचें आहे तें मी ह्या लेखांत पुढे यथास्थानीं देत आहें.

ह्याप्रमाणे मोठमोठे विद्वान ह्या दोन संप्रदायांच्या एकत्वाच्या कल्पनेच्या विरुद्ध आहेत.

पण बंगाली वाङ्मयांत ह्या बाबीशीं संबंध असणारें असें मला कांहीं सापडलें आहे. ह्या पुराव्याने तुकाराममहाराजांच्या गुरुपरंपरेचा बंगालच्या चैतन्य संप्रदायाशीं साक्षात् संबंध निश्चितपणें प्रस्थापित होत नसला, तरी कांही नवी माहिती आपल्याला खास उपलब्ध होते, व माझ्या उपर्युक्त संशयाचें दृढीकरण तरी निश्चितपणें होतें; व म्हणून हा पुरावा महाराष्ट्रांतील संशोधकांपुढे व विद्वानांपुढें मांडीत आहें.

श्रीकृष्णदास कविराज ह्या नांवाच्या एका बंगाली कवीने "श्रीश्रीचैतन्यचरितामृतम्" ह्या नांवाचें श्रीगौरांगचैतन्यांच्या चरित्रपर एक प्रदीर्घ काव्य लिहिलेलें आहे. ह्या कवीचा काल इ. स. १५१७ ते इ. स. १६१७ हा होय. श्रीगौरांगचैतन्यांच्या जीवनाच्या शेवटीं हा कवि लहान वयाचा होता. श्रीगौरांगांचा काल इ. स. १४०५ ते इ. १५३३ हा होय. ह्या कृष्णदासकवीने आपल्याला "श्रीभगवत् श्रीकृष्णचैतन्य–पार्षद," म्हणजे श्रीकृष्णचैतन्यांचा शिष्य, म्हणविलें आहे. ह्या वरून हा श्रीगौरांगांच्या श्रीकृष्ण ह्या शिष्याचा शिष्य दिसतो. 'श्रीकृष्ण चैतन्य' ह्या नांवांतहि 'राघवचैतन्य,' 'केशवचैतन्य' व 'बाबाजीचैतन्य' ह्या नांवाप्रमाणेच 'चैतन्य' ही उपाधि श्रीगौरांगसंप्रदायाची सूचक म्हणून लाविलेली जी ह्या ठिकाणीं दिसून येते ती फार लक्षांत घेण्याजोगी आहे. असो. ह्या कवीने आपल्या काव्याच्या एका एका अध्यायाला 'परिच्छेद' म्हटलें आहे; व अनेक परिच्छेदांचा एक एक असे आपल्या काव्याचे त्याने "आदिलीला," "मध्यलीला" व "अन्त्यलीला,"

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असे तीन मुख्य मोठे मोठे भाग पाडिले आहेत. ह्या पैकीं " मध्यलीला " ह्या भागाचा नववा परिच्छेद " दक्षिणदेश तीर्थ भ्रमण " म्हणून आहे. त्यांत श्रीगौरांगांनी दाक्षिणेंत कोणकोणतीं क्षेत्रें पाहिलीं व ते कोठे कोठे गेले, ह्याचें वर्णन आहे. ह्या वर्णनांत पुढील पंक्ति आहेत, त्या मुळांत जशा बंगालींत आहेत तशाच येथे देवनागरींत देतों. त्या सर्व शब्दांचे मूळ बंगालींत उच्चार करण्याची तऱ्हा फारच निराळी आहे. पण त्या उच्चाराप्रमाणे ते येथे लिहीत नाहीं. सदरहू पंक्ति येणेंप्रमाणेः—

" फाल्गुतीर्थ तबे चालि आइला गौरहरि ॥
त्रितकूप विशालार करि दर्शन ।
पंचप्सरा तीर्थ आइला शचीर नन्दन ॥
गोकर्ण–शिव देखि आइर्या द्वैपायनी ।
सूर्पारक तीर्थ आइला न्यासि–शिरोमणि ॥
कोलापुरे लक्ष्मी देखि क्षीर भगवती ।
लाङ्गा गणेश देखि चोरी भगवती ॥
तथा होइते पाण्डूपूर आइला गौरचंद्र ।
विठ्ठल ठाकूर देखि पाइल आनन्द ॥
प्रेमावेशे कैल प्रभु नर्तन कीर्तन ।
प्रभुप्रेमे देखि सबार चमत्कार मन ॥ "

ह्या उताऱ्यांतील सहाव्या ओळींत कोल्हापूराचा व तेथील देवीचा, आठवींत पंढरपूरचा, व नवव्वींत " विठ्ठलठाकुराचा ", म्हणजे श्रीविठ्ठलाचा, स्पष्ट निर्देश आहे. व श्रीविठ्ठलाचें दर्शन करून श्रीगौरांगांना भक्तिप्रेमाचा उमाळा येऊन त्यांनी त्या आवेगांत तेथे नर्तन कीर्तन केलें, व त्यांचें तें ईश्वरप्रेम पाहून सर्व लोक चकित झाले, असेंहि ह्या चरणांत अगदी स्पष्ट वर्णन आहे. श्रीगौरांग महाराष्ट्रांतहि प्रवास करून गेले, कोल्हापुरासहि येऊन गेले, त्यांनी श्रीविठ्ठलाचें दर्शनहि घेतलें, त्यावेळीं त्यांच्या भक्तिप्रेमाला सहजच उधाण आलें, व त्यांचें तें भगवत्प्रेम पाहून तेथील सर्व लोक चकित झाले, ह्यापैकी एकहि गोष्ट जुन्या–नव्या मराठी वाङ्मयांत नमूद असल्याचें, किंवा महाराष्ट्रांत आपल्याला माहीतहि असल्याचें, माझ्या तरी कोठेहि वाचण्यांत किंवा ऐकण्यांत आलेलें नाहीं. पण सदरहू पंक्तींचा लेखक सुमारे सव्वातीनशें वर्षांपूर्वीचा आहे, श्रीगौरांगांचा समकालीन म्हणण्याजोगा आहे, आणि आजच्या सारखीं दळणवळणांचीं साधनें उपलब्ध नसलेल्या त्याकाळांतहि त्यानें ही माहिती लिहून ठेविलेली आहे, ह्या गोष्टी विचारांत घेतां, त्यानें लिहून ठेविलेली माहिती विश्वसनीयच मानून चालणें वाजवी होय. आणि त्यानें अन्यथा लिहिण्याचें कांहीच कारणहि नाहीं. तेव्हा ह्या कवीनें दिलेल्या माहितीवरून हे श्रीगौरांगचैतन्य इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं केव्हा तरी महाराष्ट्रांत, व कोल्हापूर, पंढरपूर, इत्यादि ठिकाणीं येऊन गेलेले दिसतात, ही एक अगदी पहिली फार महत्वाची गोष्ट ह्या ठिकाणीं लक्षांत ठेवण्याजोगी आहे.

ह्या कवीने ह्याशिवाय आणखीहि कांही आश्चर्यकारक गोष्टी लिहून ठेविल्या आहेत. वरील बंगाली उतारा मीं माझ्याजवळ असलेल्या सदरहू ग्रंथाच्या प्रतीच्या २८९ व २९० पानांवरून दिलेला आहे. ह्याच काव्यांत ह्याच परिच्छेदाच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रारंभीच्या भागांत, पान २६५ वर, ह्या कवीने, श्रीगौरांगांनी लोकांना भक्तिमार्गास कसें लाविलें व कसें भजन करण्यास शिकविलें, तें दिलें आहे. कवि म्हणतोः--

"प्रभु कहे सबे कह 'कृष्ण कृष्ण हरि'।
गुरुकर्णे कह कृष्णनाम उच्च करी ॥
... ...

गुरुकर्णे कहे 'कह कृष्ण राम हरि'।"

ह्या उताऱ्यांतील "कृष्ण राम हरि" हें भजन श्रीगौरांगांनी पराभूत बौद्धांस शिकाविलें हें वाचून, आमच्या महाराष्ट्रांतील वारकरीसंप्रदायाच्या "रामकृष्ण हरि" ह्या, टाळांच्या तालावर तासन् तास गरजणाऱ्या भजनाची कोणाला आठवण झाल्यावांचून राहील! हें विलक्षण साम्य निव्वळ यादृच्छिकच मानावयाचें काय! एक वेळ मानलेंहि असतें. पण गौरांगप्रभु महाराष्ट्रांत येऊन गेले, खुद्द कोल्हापुर–पंढरपुरला येऊन गेले, त्यांनी पंढरीच्या श्रीविठ्ठलापुढे भजन केलें, व लोक त्यांच्या भक्तिप्रेमाने प्रभावित झाले, हें सर्व वर्णन वाचल्यावर मात्र हें विलक्षण सादृश्य निव्वळ यादृच्छिकच व केवळ काकतालीय न्यायाचेंच मानण्यास मन एकाएकी तयार होत नाही, येवढें खरें.

वरील दोन्ही बंगाली उताऱ्यांचें मराठी भाषांतर मी दिलें नाही, कारण, ते सहज कळण्याजोगेच आहेत, व त्यांतील महत्त्वाच्या भागांचें मीं वर विवेचन केलेलेंच आहे. असो.

हा झाला बंगाली वाङ्मयाचा आधार. पण खुद्द मराठी वाङ्मयांत ह्याला कोठे कांही पुष्टिकारक सापडतें कीं नाही, हेंहि पाहिलें पाहिजे. तेंहि सांपडतें असें वाटतें. तें येणेप्रमाणे. वर जिचें एक अवतरण दिलें आहे ती श्रीतुकारामांची शिष्यीण संत बहिणाबाई हिचा एक फारच फार आश्चर्यकारक असा अभंग आपल्या प्रस्तुत विषयाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. संत बहिणाबाई म्हणतेः—

"गुरुपरंपरा आम्हां चैतन्य बळी।
तयाचे स्मरणें आम्ही वैकुंठी बळी ॥१॥
नमस्कार हा तया साष्टांग माझा।
वोवाळूं जीवें साधु चैतन्य राजा ॥२॥
चैतन्य हा सर्वगत व्यापक सद्गुरु।
प्रकटला हा तुकारामवेषें दातारू ॥३॥
तयाचें हें ध्यान सदा माझीये अंतरीं।
अंतरींचें ध्यान तुका सबाह्याभ्यंतरीं ॥४॥
नेणें स्नान दान जप आसन मुद्रा।
सदा सर्वकाळ ध्याऊं चैतन्यपदा ॥५॥
बहिणी म्हणे मुक्त आम्ही सद्गुरुचे ध्यानें।
प्रेमें भक्तीभावें तया वोवाळूं प्राणें ॥६॥"

ह्या अभंगांत अनेक गोष्टी फार पाहण्यासारख्या आहेत. पैकी पहिली ही की, ह्या अभंगांत 'चैतन्य' हा जो शब्द चार वेळां आला आहे, तो चारहि वेळीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"सद्‌गुरु"लाच उद्देशून आला आहे; जड-चैतन्यांच्या जोडींतील चैतन्याला उद्देशून नव्हे, दुसरी गोष्ट ही कीं, दुसऱ्या चरणांतील "तयाचे", तिसऱ्यांतील "तया", चवथ्यांतील "साधु चैतन्य राजा", पांचव्यांतील "चैतन्य हा", सहाव्यांतील "प्रकटला हा", सातव्यांतील "तयाचे", व अकराव्यांतील "सद्‌गुरुचे" हे, ह्या केवळ बारा चरणांतील सात निर्देश सर्व एकवचनीच, व एका व्यक्तीला उद्देशूनच, आहेत. आमची "गुरुपरंपरा" 'चैतन्यापासून' आली आहे, असें ह्या अभंगाच्या पहिल्या कडव्यांत स्पष्ट म्हटलें आहे. दुसऱ्या कडव्यांत त्या सद्‌गुरुचा निर्देश "साधु चैतन्य राजा" असा एकवचनी व व्यक्तिवाचक केला आहे. "हा (एकवचनी) चैतन्य सर्वगत व व्यापक सद्‌गुरु आहे", असें तिसऱ्या कडव्यांत म्हटलें आहे. पांचव्या कडव्यांत "सदा सर्वकाळ" ह्या "चैतन्या"च्या "पदांना" "ध्याऊं" असा एकवचनी व व्यक्तिवाचकच निर्देश पुनः चवथ्याने आला आहे. व सहाव्या कडव्यांत पुनः एकदां ह्या 'चैतन्या' ला "सद्‌गुरु" म्हटलें आहे.

प्रश्न असा आहे कीं, हा सर्व अभंग कोणत्या "चैतन्य सद्‌गुरु" ला उद्देशून केला आहे ? तुकाराममहाराजांच्या गुरुपरंपरेंत तर राघव, केशव, व बाबाजी, असे तीन 'चैतन्य' आलेले आहेत. आणि हा संबंध अभंग तर कोणा तरी एकाच "चैतन्य सद्‌गुरु"ला उद्देशून केलेला आहे. मग हा ह्या तीनपैकीं कोणत्या 'चैतन्या'ला उद्देशून मानावयाचा ? व त्यालाच उद्देशून कां मानावयाचा ? त्या 'चैतन्य' शब्दामागे नांव तर कोणाचेंच नाही ? असा हा नांवच वगळून बहिणाबाईने अभंग कसा केला ? आपल्या तुकारामांपूर्वींच्या सर्व गुरुपरंपरेला वंदन करण्याचा बहिणाबाईचा येथे विचार आहे म्हणावें, तर ह्या अभंगांतील सर्वच, व तेहि थोडेथोडके नव्हेत तर बाराच चरणांतील सात, निर्देश सारे एकवचनीच कसे ? आपल्या तुकारामपूर्व गुरुपरंपरेंतील तीनपैकी कोणतीहि एकच व्यक्ति बहिणाबाईने येथे वंदनार्थ मनश्चक्षूपुढे ठेविली आहे असें म्हटलें तर, ते सर्वच आपल्या सद्‌गुरूचे गुरु असतां, ती एकच, व तीच व्यक्ति, तिने वंदनार्थ कां घेतली ? जर ह्या तिघांपैकीं कोणीहि हा अभंग रचतांना बहिणाबाईच्या मनश्चक्षुपुढे असतें, तर ह्या व्यक्तीचें तिने ह्या अभंगांत नांवहि घालावें हेंच जास्त स्वाभाविक व सरळ नव्हतें काय ? ही स्वाभाविक गोष्ट येथें कां घडली नाही ? नुसत्या 'चैतन्य' येवढ्याच नांवाने ह्या तीन 'चैतन्या'पैकी कोणीहि एक पुरुष ओळखला जात असे असा इतिहास उपलब्ध आहे काय ? तसा तो असल्याचें माझ्यातरी ऐकिवांत नाही, म्हणून, ह्या अभंगांतील नुसत्या "चैतन्यसद्‌गुरु", "साधु चैतन्य राजा", इत्यादि शब्दप्रयोगांनी, केवळ "चैतन्य" येवढ्याच नांवाने ओळखला जाणारा जो सर्वांत प्रख्यात पुरुष असेल, तोच, म्हणजे श्रीगौरांग चैतन्य असाच, अर्थ धरणें प्राप्तच दिसतें.

शिवाय, 'तुकारामवेषें श्रीचैतन्यसद्‌गुरु प्रकटला' असें विधान ह्या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यांत आलें आहे. विश्वव्यापक चैतन्य तुकाराम झालें, असा त्या कडव्याचा अर्थ लावतांच येणें शक्य नाही. विश्वव्यापक चैतन्य केवळ तुकाराम नव्हे, तर सारें विश्वच झालें आहे ! मग तें तुकाराम झालें आहे असें सांगण्यांत स्वारस्य काय ? व हें सांगितल्यापासून तुकारामाचें वेगळें मोठेंपण काय सांगितलें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गेलें ? अभंग तर श्रीतुकाराममहाराजांविषयीं आपली उत्कट गुरुभक्ति व्यक्त करण्याकरितां केलेला आहे. तसेंच, विश्वव्यापक चैतन्याला कोणी " सद्‌गुरु " कसें व कां म्हणेल ? " तुकारामवेषें " जो " सद्‌गुरु " " प्रकटला " असें म्हटल्याने श्रीतुकारामांचें माहात्म्य वाढलें असें वाटेल, किंवा कांहीतरी श्रेष्ठ ठरलें असें वाटेल, असाच तो सर्वांत श्रेष्ठ " चैतन्य " असला पाहिजे. नाहीतर तो " तुकारामवेषें प्रकटला " असें बहिणाबाईने मुद्दाम सांगण्यांत अर्थ काय ? पण जो तुकारामवेषें प्रकटला असें म्हटल्यानें तुकारामांचें महत्त्व वाढलें असें वाटेल, इतका मोठा " चैतन्य " ह्या तिघांतील कोण ? बाबाजी खासच नव्हेत. कारण, गुरूनेच शिष्यरूपाने अवतार घेतला, असें कोठेच म्हटलेलें पाहण्यांत नाही; व तसें म्हणणें शक्यहि नाहीं. कारण, ते दोघे समकालीन असल्याशिवाय, व त्या दोन वेगळाल्या व्यक्ति असल्याशिवाय, एक दुसऱ्याला उपदेश करणार कसा ? स्वतःच जर स्वतःच्या शिष्यरूपाने अवतार घेतला, तर मग उपदेश करण्याची तरी गरज काय ? कारण, गुरु स्वतः मुळांत पूर्ण ज्ञानी आहेच. आणि स्वतःच शिष्यरूपाने अवतार घेऊन जर गुरूने शिष्याला उपदेश केला, तर गुरूने पुनः स्वतःच स्वतःला उपदेश करून घेतला, असें म्हणण्याचा हास्यास्पद प्रसंग येणार. तेव्हा, ज्याचा अवतार तुकाराम असल्यामुळे तुकाराम श्रेष्ठ, तो " चैतन्य " बाबाजी नव्हे, हें निश्चित मग जे दोन आणखी बाबाजीहून पूर्वीचे " चैतन्य " उरले, त्यांपैकीं कोणता " चैतन्य " येथे अभिप्रेत आहे, हें नामानिर्देशावांचून कसें कळणार ? आणि तेथे तर नामनिर्देशच नाही ? बाबाजींच्या आधीं ह्या गुरुमालिकेंत एकच कोणी " चैतन्य " उरला असता तरी भागलें असतें. मग तोच " चैतन्य " येथें अभिप्रेत मानतां आला असता. पण येथे दोन " चैतन्य " मागे उतरले असतांना, व त्या दोघांपैकीं एकाचाहि नांवाने निर्देश नसतांना, त्यांतील एकहि येथें उद्दिष्ट मानतां येत नाही. तेव्हा, अर्थात् त्या दोघांहूनहि निराळा व जो नुसत्या 'चैतन्य' ह्या नावाने ओळखला जात होता असा, व जो " तुकारामवेषें प्रकटला " असें म्हटलें असतां श्रीतुकारामांस अधिक श्रेष्ठत्व आलें असें बाहिणाबाईस वाटत होतें असाच, म्हणजे चैतन्य संप्रदायाचा आद्यसंस्थापक श्रीगौरांग चैतन्य हाच, पुरुष येथें उद्दिष्ट असला पाहिजे, असेंच म्हणावें लागतें. दुसरा मार्ग दिसत नाही.

त्याचप्रमाणे, राघव, केशव, बाबाजी ह्या तीन "चैतन्यां"–चा स्वतःच्या नांवावांचून नुसता " चैतन्य " म्हणून निर्देश कोठे आढळून येत नाही, हें पूर्वी सांगितलेंच आहे. श्रीगौरांगचैतन्यांचे मात्र नुसत्या " चैतन्य " किंवा " चैतन्यप्रभु " ह्या नावांनीं केलेले निर्देश शेकड्यांनी नव्हे हजारांनीं देखिल मोजून पुरे होणार नाहीत इतके दाखवितां येतील. लाल, बाल, पाल, गांधी, टागोर, सावरकर, वगैरे नांवांच्या, किंवा हे नामांश ज्यांच्या नावांत आहेत अशा, शेकडो व्यक्ति हिंदुस्थानांत असल्या, तरी त्या त्या संक्षेपाने त्या नामांशाची किंवा संबंध नांवाची सर्वांत प्रसिद्ध व सर्वांत मोठी जी व्यक्ति असेल तीच दर्शित होते व आठवते, त्याचप्रमाणे ह्याहि ठिकाणीं " चैतन्य " ह्या संक्षिप्त निर्देशाने, राघव–केशव–बाबाजी ह्या कोणत्याहि विशिष्ट व त्या मानाने कमी प्रसिद्ध व्यक्तीच्या नामनिर्देशाच्या अभावीं " गौरांगचैतन्य " हाच अर्थ घेणें वाजवी व उचित आहे. विशिष्ट नामनिर्देश कमी प्रसिद्ध असलेल्याला लागतो; अधिक प्रसिद्ध असलेल्याला नव्हे.

तसेंच, " साधुचैतन्यराजा " ह्याचा अर्थ काय लावावयाचा हाहि प्रश्न आहेच. 'राजा' शब्द कोणीकडे लावावयाचा ? " चैतन्यांचा (चैतन्यसंप्रदायी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लोकांचा) राजा असलेला साधु " असा अर्थ केला, तर त्याचा अर्थ श्रीगौरांग चैतन्य हाच होतो; व दुसरा कांहीहि शक्य दिसत नाही. आणि तसा अर्थ न करतां " साधूंचा राजा असलेला चैतन्य " असा त्याचा अर्थ केला, तरी तो अर्थ पुनः गौरांगचैतन्यांनाच सर्वात जास्त लागू होतो. कारण, राघव–केशव–बाबाजी ह्या चैतन्यत्रयांत कोणीच " साधूंचा राजा " म्हणण्याइतका प्रख्यात पुरुष झालेला नाही. आणि ह्या ठिकाणीं ह्याशिवाय " राजा " हें पद तिसरीकडे कोठेच लावतां येत नाही. त्यामुळे, येथे ह्या पदाच्या शक्य असलेल्या दोन्ही अर्थांनी श्रीगौरांग-चैतन्यच द्योतित होतात, असेंच म्हणावें लागतें.

काळाच्याहि दृष्टीने ह्या सर्व घटना बरोबर जुळतात, व माझ्या संशयास पुष्टिच मिळते. इ. स. १४८५ ते इ. स. १५३३ हा श्रीगौरांगांचा काल; तेव्हा, स्वाभाविक-पणेच ते वयाच्या पंधराव्या वर्षाच्या पुढे म्हणजे सोळाव्या शतकाच्या सुरवाती-नंतरच केव्हातरी महाराष्ट्रांत आलेले असले पाहिजेत. ते पंढरीस आले तेव्हा त्यांच्या अत्युत्कट भक्तिप्रेमाने प्रभावित झालेल्या लोकांत कदाचित् श्रीतुकारामांच्या गुरु-परंपरेतील अगदी पहिला पुरुष असणें शक्य आहे; व त्याने श्रीगौरांग संप्रदायाची दीक्षा किंवा श्रीगौरांगांचा गुरुमंत्र घेतल्याकारणानेच "चैतन्य" ही उपाधि अगदी प्रथम त्याच्या नांवाला लावली गेली असावी; व म्हणूनच मग पुढे राघवचैतन्य, केशवचैतन्य, बाबाजीचैतन्य इत्यादि नांवाचे तीन पुरुष सुमारे एका शतकांत तीन पिढ्यांत ह्या परंपरेंत येत गेले, इतक्यांत सतराव्या शतकांत इ. स. १६०८ त तुकाराममहाराज जन्मास आले. श्रीतुकाराम भगवद्भक्त तर उपजतच होते; व त्यांना आत्मकल्याणाची तीव्र इच्छा लहानपणापासूनच होती. अशा ह्या उत्कट मुमुक्षूला थोडेंबहुत कळूं लागून पूर्वजन्मसंस्कार हृदयांत तीव्रतेने उसळून उमटूं लागतांच बाबाजीचैतन्य ह्यांचा गुरुमंत्र लाभला असावा, ही गोष्ट मुळींच अशक्य नाही. अशा रीतीने श्रीतुकारामांच्या गुरुपरंपरेतील पुरुषांच्या नांवापुढे "चैतन्य" ही, महाराष्ट्रांत लोकाविलक्षणच ठरणारी, उपाधि लागली असावी, हें जास्त संभाव्य वाटतें.

राहतां राहिला प्रश्न द्वैताद्वैतभेदामुळे बंगाली व महाराष्ट्रीय चैतन्यसंप्रदायांच्या भिन्नतेचा. प्राचार्य दांडेकरांनी दाखविलेला ह्या दोन संप्रदायांतील हा द्वैता-द्वैताचा भेद खरा असला, तरी तो इतका नडणारा भेद आहे कीं नाहीं, व त्यामुळे हे दोन संप्रदाय भिन्नच मानणें भाग आहे काय, हा विचाराचा प्रश्न आहे. मला स्वतःला तो तितका नडणाराहि भेद वाटत नाही, व त्यामुळेच केवळ हे दोन संप्रदाय भिन्न मानणें भाग आहे असेंहि वाटत नाही. ह्याचीं कारणें अशीं. केवळ बंगालचाच नव्हे, तर उत्तर हिंदुस्थानांतील सर्व भाषां-तील यच्चयावत् भक्तिसंप्रदाय, व महाराष्ट्रांतील भक्तिसंप्रदाय, ह्यांच्या वृत्तींत, इतिहासांत, व परंपरेंत, एकप्रकारचा मूलभूत भेदच आहे. ज्या कोणी उत्तर हिंदुस्थानांतील भिन्न भाषांतील भक्तिवाङ्मयाचा, व मराठींतील भक्तिवाङ्म-याचा, थोडाहि सूक्ष्म व काळजीपूर्वक अभ्यास केला असेल, त्याला हें माहितच आहे कीं, उत्तरेच्या भाषांतील भक्तिवाङ्मयाचा सर्व मुख्य भर सगुणावर व साकारावरच आहे. अवतार व त्यांच्या लीला ह्यांनाच त्यांनी आपला भक्तीचा नैवेद्य प्रायः सर्व अर्पण करून टाकला आहे; व म्हणून तिकडील भाषांतील
 भक्तिसंप्रदायांची वृत्ति, दृष्टि, त्यांचा इतिहास, व त्यांची परंपरा, ह्या सर्वांवर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकप्रकारें द्वैताची दाट छाया पसरलेली आहे. त्यांना निर्गुण–निराकार, किंवा अद्वैत, माहीत नाही किंवा अन्ततः मान्य नाही असे नाही. तें त्यांना माहितहि आहे, व अखिल भरतखंडाच्या भक्तिसंप्रदायाच्या वैशिष्ट्यास अनुसरून, त्यांना कोठेतरी दूर तें शेवटीं मान्यहि आहे; पण त्यांच्या भक्तीची रमणीय बाग मुख्यतः सारी सगुण–साकाराच्या प्रदेशांतच खुलली, बहरली, आणि फुलली आहे. निर्गुण–निराकाराचा व अद्वैताचा प्रदेश हा तेथे जवळजवळ दृष्टि–आड झाल्याइतकाच दूर व अंधुक राहिला आहे. ह्याच्या उलट, महाराष्ट्रांतील भक्तिसंप्रदायांत सगुण–साकाराची अवीट गोडी संतांनी उमोप चाखली असली, तरी, हें निर्गुण–निराकाराचें व अद्वैताचें केवळ प्रतीक आहे, हें त्या खऱ्या बागेचें केवळ अप्रतिम सुंदर चित्र आहे, ह्याच्या मागलें निर्गुण–निराकाराचें निरंजन नन्दनवन व अद्वैत हेंच खरें अन्तिम सत्य आहे, व तीच खरी शेवटल्या विश्रान्तीची जागा आहे, ह्याचें विस्मरण महाराष्ट्रीय संतांना व भक्तांना कधींहि झालेलें नाहीं; व ह्यामुळे सगुण–साकाराच्या फांदीच्या खुणेने नेहमी निर्गुण–निराकाराची आकाशांतली दूरची व बारीक चंद्रकोर हेरण्याच्याच प्रयत्नांत ते सदा मग्न आहेत त्यांची मुख्य दृष्टि सदा त्या चंद्रकोरीवर आहे; सगुण-साकाराच्या फांदीवर नाही. त्यांना ही फांदी फक्त दृष्टीची दिशा नक्की करण्यापुरतीच हवी आहे. संध्याकाळच्या रंगीत आकाशावर दिसणारी त्या फांदीच्या सौंदर्याची अप्रतिम शोभा हीहि त्यांना दिसतेच आहे, व त्या सौंदर्याचा आनंदहि ते मनसोक्त व पुरेपुर लुटीतच आहेत; पण त्या आनंदांतच रंगून व रमून ते तेथेच थांबत नाहीत; तर संध्याकाळच्या रंगीत आकाशांत हरवलेल्या त्या बारीक चंद्रकोरीचाच त्यांचे डोळे विरहिणीच्या आर्ततेने व आतुरतेने एकसारखा शोध करीत आहेत. नामदेवांच्या हातचें गरम-गरम दूध स्वतः विठोबा पीत असत, पण गोराकुंभाराने डोक्यावर थापटणी मारून, नामदेवांचें मडकें कच्चें असल्याचा भयंकर निर्णय दिला, तेव्हा रागावून व खिन्न होऊन नामदेवांनी खुद्द चालत्या-बोलत्या पंढरीरायाजवळच ही तक्रार नेली; पण श्री विठोबांनी त्यांना ज्ञानेशांकडे पाठविलें, व ज्ञानेशांनीं आपला शिष्य विसोबा खेचर ह्याला नामदेवांस उपदेश देण्यास सांगितलें, तेव्हा विसोबा खेचरांनी नामदेवांना निर्गुण-निराकार अनुभवास आणून दिलें, व मग नामदेव कृतार्थ झाले; ह्या लहानशा कथेंत महाराष्ट्राच्या दिव्य भक्ति-संप्रदायाची सर्व वृत्ति, दृष्टि, इतिहास, व परंपरा, ही साठविलेली आहेत. असें असल्यामुळे, श्रीगौरांगांच्या बंगाली भक्तिसंप्रदायाच्या गंगेंत जरी द्वैताचें गोड चांदणेंच मधुरपणाने प्रतिबिंबित झालेलें दिसत असलें, तरी त्या गंगेने वहात वहात महाराष्ट्राच्या कडेदऱ्यांनी भरलेल्या डोंगराळ भूमींत प्रवेश करीतोपर्यंत पहाट होऊन, त्या उंच डोंगरांमागून फांकत असलेल्या अद्वैताच्या उषःकालाचे मनोरम आकाशस्थ वर्ण प्रतिबिंबित करूं लागावें, ह्यांत नवल वाटण्याजोगें काय आहे ! ज्या प्रदेशांतून पाणी वहाणार त्याचा गुण तें घेणारच. मग ती गंगा कां असेना. साधीं व्यवहारांतलींच उदाहरणें पाहा. कोणीहि दुसऱ्याची भाषा बोलतो तो आपल्या जन्मभाषेचा विशिष्ट हेल व उच्चारपद्धति त्या भाषेला लावूनच बोलतो. कोणीहि कांहीहि नवें समजावून घेतो तें आपल्या आधींच परिचित असलेल्या परिभाषेंत बसवूनच तें समजावून घेतो; एरव्ही त्याला तें ग्रहणच करतां येत नाही.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ओळखीची किल्ली चालवूनच अपरिचिताला मनाचा दरवाजा उघडून आंत प्रवेश करून घेतां येतो; नाहीतर त्या "अज्ञात कुलशीला-"ला प्रवेश मिळणारच नाही. तसेंच येथेंहि झालें असावें. अद्वैत महाराष्ट्राच्या हाडीं-मांसीं मुरलेलें आहे. जें ज्या प्रान्तांत जाईल त्या प्रान्ताच्या स्वभावाचा त्याला रंग चढणारच. जें महाराष्ट्रांत येईल त्याला महाराष्ट्राच्या स्वभावाचा रंग येणारच. भक्तीची लाट अखिल भरतखंडांत जवळ जवळ एकदमच उसळली व कोणत्यांहि एका प्रान्तांतून दुसऱ्या प्रान्तांत ती जाण्याची तादृश आवश्यकता नसली, तरीहि जर यदाकदाचित्, प्रस्तुत श्रीतुकोबांच्या गुरुपरंपरेच्या बाबतींत जो प्रकार झाला असल्याचा संभव दिसतो, त्याप्रमाणे, एका प्रान्तांतील भक्ति-संप्रदायाची एक शिष्यशाखा कांही योगायोगाने जर दुसऱ्या प्रान्तांत एक फांदी फुटून विस्तारत गेली, तरी ती शाखा, मूलभूत उपदेश कायम ठेवूनहि, खास आपल्या प्रान्ताची परंपरा, दृष्टि, व वृत्ति, ह्यांचीं पुटें चढवून व ह्यांनी रंगवूनच तो मूळ उपदेश व तो संप्रदाय ग्रहण करील व पुढे चालवील, असाच संभव जास्त आहे. "स्वभावो दुरतिक्रमः" हें सर्व जाणतातच. आणि म्हणून, त्याप्रमाणेच प्रस्तुत स्थळींहि होऊन, श्रीतुकोबांची गुरुपरंपरा खरोखरीच श्रीगौरांगां-कडून आली असूनहि, बंगाली चैतन्य संप्रदाय द्वैतीच राहावा, पण नामदेव-ज्ञानेश्वरा-पासून शेकडों वर्षें अद्वैताचीच परंपरा घेऊन अव्याहत चालत आलेला महाराष्ट्रीय भक्तिसंप्रदाय स्वतः अद्वैतीच राहावा, व त्याने त्या नव्या आलेल्या चैतन्यसंप्रदायासहि आत्मसात् करून अद्वैतीच करून टाकावें, ह्यांत अशक्य असें कांहीच दिसत नाही. असें झालेंच असें आजच्या माहितीच्या स्थितींत कोणालाहि म्हणतां येणार नाही. पण असें होणेंच शक्य नाही, असेंहि पण आज कोणालाच म्हणतां येणार नाही. म्हणूनच ह्याचा विचार व शोध व्हावा असें वाटतें. तेव्हा, बंगाली चैतन्यसंप्रदाय द्वैती आहे, व महाराष्ट्रीय चैतन्यसंप्रदाय अद्वैती आहे, येवढ्यावरून ह्या दोहोंचें मूळहि भिन्न असलेंच पाहिजे असा सिद्धांत निघतो असें मुळीच वाटत नाही.

शिवाय, आपलें द्वैतमत आपल्या महाराष्ट्रीय शाखेवर पूर्णपणे ठसवावें इतका श्रीगौरांगांचा पंढरपुरांत किंवा महाराष्ट्रांत मुक्काम झालाच असेल कशावरून ? ते आले, त्यांचा प्रभाव पडला, व भक्तीच्या परंपरेची एक आणखी नवी ज्योत त्यांनी येथे पेटविली न पेटविली तों ते निघूनहि गेले, असेंहि झालें नसेल कशावरून ? तात्विक वादविवाद करून आपलें द्वैतमत महाराष्ट्रीयांच्या गळीं उतरविण्याइतका अवकाश तरी त्यांना मिळाला कीं नाही कोण जाणे ! तसेंच, एखाद्या दिग्विजय करूं इच्छिणाऱ्या शास्त्री-पंडिताप्रमाणे, द्वैत किंवा अद्वैत वेदान्तमत वादविवादाने प्रस्थापित व प्रचारित करीत बसणें, किंवा खोडून काढीत बसणें, हा त्यांचा आपल्या संचारांतील उद्देश होता, कीं जाऊं तेथे भक्तिगंगा शिंपडून सारें जग पवित्र व हिरवेंगार करून सोडूं, हा त्यांचा देशपर्यटणांतील हेतु होता ? अर्थात्, हा दुसरा सांगितला हाच त्यांचा हेतु होता; त्यांनी अंगिकारलेलें, किंवा त्यांच्या प्रभावाने घडणारें, स्वकार्य व स्वाभाविक कार्य हेंच होतें. म्हणून तें होतांच ते निघूनहि गेले असतील. त्यांच्या महाराष्ट्रीय शिष्यांनी त्यांना, "तुम्ही द्वैती कीं अद्वैती ?" हा प्रश्नहि कधी केला नसेल ! त्यांना, तो सुचलाहि नसेल ! सुचण्याचें काय कारण ? व सुचण्याचा प्रसंगच कोणता ? तसेंच, हे आपले नवे महाराष्ट्रीय शिष्य, किंवा हा आपला महाराष्ट्रीय शिष्य, मूळचा अद्वैती आहे हें श्रीगौरांगांनाहि

उलटपक्षीं माहीतसुद्धां नसेल. तो वेदान्तचर्चेचा प्रसंगच नव्हे; व ह्या गोष्टी त्यावेळीं

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निघण्याचें व कळण्याचें कारणहि नाही. म्हणून, गुरुपरंपरा श्रीगौरांगांकडील, पण मत महाराष्ट्रीय अद्वैती, असें मिश्रण श्रीतुकारामांच्या परंपरेंत होणें मुळीच अशक्य नाही.

कसेंबसें करून तुकाराममहाराजांची गुरुपरंपरा महाराष्ट्राबाहेर नेऊन टाकण्यांत कोणाहि महाराष्ट्रीयाला कांहीं जास्त वेगळा आनंद होण्याचें मुळीच कारण नाही; व मला तो होत आहे म्हणून ह्या प्रतिपादनाचा सर्व खटाटोप मी करीत आहें हें शक्य नाही. पण हा प्रान्तीयतेचा प्रश्नहि नाही. तसें पाहिलें तर अखिल भरतखंडांतील यच्चयावत् सर्व भक्तिसंप्रदायांचा उगम मद्रासइलाख्यांतील श्रीरामानुजाचार्यांपासून, त्यांच्या तत्त्वज्ञानापासून व संप्रदायापासून, झाला, असें मानण्याची रीत नाही काय? तेथे प्रान्तीयता कोठे आड येते? आणि यावी तरी कां? अखिल भरतखंड इतिहासाने, परंपरेने, व संस्कृतीने जर एकच आहे, तर श्रीतुकारामांचीहि गुरूपरंपरा खरोखरीच संशोधनान्ती जर बंगालमधील गौरांग संप्रदायाशी जोडली गेली, तर त्याचें तरी वाईट वाटण्याचें कारण काय?

तेव्हां संभाव्य वाटतें तें हें कीं, श्रीगौरांग कोल्हापुर-पंढरपुराकडे आले असतां कोणी तरी महाराष्ट्रीय त्यांचे शिष्य झाले असावे; त्याच परंपरेंत मग राघव-चैतन्य, केशवचैतन्य, व बाबाजी-चैतन्य, हे झाले असावेत; व ह्याच परंपरेंत मग शेवटीं श्रीतुकाराममहाराज झाले असावेत. बहिणाबाईने 'चैतन्य सद्गुरु' म्हणून निर्देश केला आहे तो स्वतः गौरांगचैतन्यांनाच उद्देशून असावा. आणि "रामकृष्ण हरि" हें वारकरीसंप्रदायांतील आपल्याकडील भजनहि कदाचित् श्रीगौरांगांच्या परंपरेंतूनच आपल्याकडे आलें असण्याचाहि संभव आहे. असें हें सर्व झालें असावें कीं काय, ह्याचा विचार व शोध व्हावा, हें इष्ट आहे.

आज पेटला

★

आज पेटला पेटला हृदयांत आगडोंब
गेला जळून जळून उगवला भावकोंब
कोंडमारा! कोंडमारा! साहवेना! साहवेना!
रितें करूं मन कोठें? समजेना! समजेना!
माझ्या मींच जमविल्या ज्वालाग्राही समीधा या
मीच टाकीला स्फुलिंग जागेपणीं मोहूनीया
ज्वाला भडकल्या ज्वाला, लागे वणवा भीषण
कडाडती ओले वृक्ष झाले दुभंग पाषाण!
भांबावलों! भांबावलों! कांहीं सुचेना सुचेना
कसा विझवूं वणवा पाणी कोठेंहि दिसेना
लांब काटेरी या जिव्हा अग्निदैत्याच्या भुकेल्या
क्रूर मिठींतून येई सुटतां न कांही केल्या!
निरूपाय! निरूपाय! हाय! उडाला भडका
कुणा कशा कळों याव्या तीव्र आंतील धडका!
करपलें चित्त, आटे नेत्र कडावर येंव—
कसा विझेल विझेल मृगजळा आगडोंब!!

—वसंत वऱ्हाडपांडे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१०९५२
बुंगळे

लघुकथा

अर्थ नियोजन

वैकुंठ इंगळे

★

काल घडलेला प्रकार. नेहमीसारखाच. प्रतिष्ठितांच्या किंचित् नजरेआडच्या सृष्टीत घडलेला येवढेंच.

चिरपरिचित—'गरिबाला एक पैसा' 'दया करा मायबाप'—अशीं करुण आर्जवें त्या दिवशीं ऐकूं न येतां—'गरिबाला पुरण्यासाठी कांहीतरी पदरांत टाका धनी,' असा विलक्षण आर्तस्वर कानीं येत होता. एक सूर्यस्नान करीत असलेलें प्रेत रस्त्याच्या कडेला ठेवून व तो मुडदा घाणेरड्या लक्तरांनी भेसूर करून त्याचा एक जातभाई आपल्या भरड्या आवाजांत 'गरिबाच्या दफनाकरिता'च्या पालुपदानें जाणाऱ्या येणाऱ्यांच्या मनांत दया उत्पन्न करीत होता.

सभोंवती बघ्यांची एकच गर्दी जमली होती. प्रेताच्या जवळ पसरून ठेवलेल्या एका कापडाच्या तुकड्यात पैसे जमत होते. जसजसे पैसे जमत तसतसे शब्दहि गोळा होत. कांही एका पैशाचें पुण्य विकत घेऊन परलोकींची साठवण करीत. कांहींना दुष्काळनिवारणाच्या चर्चेसाठी शब्द अपुरे पडत. कांहींना दान करणें चांगलें कीं वाईट या प्रश्नाचें उत्तर गवसत नव्हतें तर कांहींना या घटनेंत अन्नप्रश्न कणाने सुटण्याची आशा दिसे.

या सर्व प्रकाराचा खोल ठसा माझ्या मनावर उमटला, आणि दुसरे दिवशी त्याच जागेवरून जाण्याचा प्रसंग आला.

तेथून थोड्याच अंतरावर दारूने तर्रर झालेला, लक्तरें चिकटविलेला, एक इसम पावलागणित ठेंचाळत व झोकांड्या खाऊन उचक्या देत समोरून जात होता. संदिग्ध व असंबद्ध शब्दांत तो पंधरा गाण्यांच्या चाली एकदम म्हणत होता. कालच्या प्रेताचा तो रखवालदार होता.

आठ वाजले असतील फार तर. त्यावेळीं रहदारी फार नव्हती. दिव्याच्या प्रकाशांत त्याचे डोळे अंधारल्याने त्याचा ताल व तोल बहकला होता. उसन्या बळाने स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करीत तो त्या प्रेतावर आदळला. तेथे गोळा झालेल्या पैशांनी त्याने मूठ भरुन घेतली. पवित्रा असा कीं हे पैसे जणुं तें प्रेत त्याच्याजवळून हिसकून घेईल.

त्याने स्वतःला सावरलें. पुढ्यांतल्या प्रेताला एक लाथ मारून आपलेपणाने म्हणाला —"कहो दोस्त! आज की कमाई कुछ बुरी नहीं! चार रोज खायेंगे और पीयेंगे! परेशानी कुछ नहीं!"

—आणि समारोपादाखल पुनः एकदा त्या मढ्याला लाथ मारण्याचें कर्तव्य पार पाडून तो पसार झाला.

हें त्याचें भांडवल कुणी चोरुन नेणें शक्य नाही हें त्याला पुरतें ठाऊक होतें. तथापि उद्याच्या व्यापाराला तें उपयोगी पडेल कीं नाही याचा विचार करण्याच्या स्थितींत तो नव्हता. तीन दिवसांच्या अर्थांची योजना त्याने केली होती. त्यानंतर कोणतें भांडवल निवडणार याचा विचार कदाचित् एखाद्या गटारांत उद्यापर्यंत तो करून ठेवील!

———

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचारतरंग ★ १ ★ चिकित्सक

✻

खरोखरच, वाङ्मयाचें पूर्णपणें वस्तुनिष्ठ आणि व्यक्तिनिरपेक्ष असें मूल्यमापन कधीकाळीं तरी शक्य होईल किंवा नाही याबद्दल मला राहून राहून शंका वाटते. एका 'युगप्रवर्तक' साहित्यिकाबद्दल दोघा रसिकश्रेष्ठांचीं 'दोन ध्रुवा' इतकीं परस्परविरोधी मतें पाहिलीं म्हणजे सामान्य वाचकाच्या मनांत विस्मयाचें 'वादळ' उत्पन्न होतें. अलीकडे फडके जेव्हा आधुनिक मराठींतील प्रथितयश नाटककारांबद्दल बोलतात किंवा लिहितात तेव्हा ते किर्लोस्कर, देवल, खाडिलकर आणि गडकरी या चौघांबद्दलच अत्यंत गौरवपर उद्‌गार काढतात; या चौघांनीच मराठी रंगभूमि गाजविली असें ते सूचित करतात; आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना मात्र अनुल्लेखाने अजिबात वगळतात. कोल्हटकरांचे शिष्यवर असलेल्या खांडेकरांना हा अनुल्लेख बराच झोंबलेला असावा असें दिसतें. फडक्यांनी श्रीपाद कृष्णांच्या नाटकांबद्दल दाखविलेल्या या उदासिनतेबद्दल खांडेकर रा. गोमकाळयांच्या 'नाटककार कोल्हटकर' या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत लिहितात, "किर्लोस्करांपासून मराठी नाटकांचा त्यांनी (म्हणजे फडक्यांनी) सांगितलेला इतिहास ऐकणाराला कोल्हटकर या नांवाची दहा वर्षे संगीत रंगभूमि गाजविणारी, मराठी नाट्यवाङ्मयाला नवें वळण लावणारी, गडकरी वरेरकरांसारख्या यशस्वी नाटककारांना गुरुस्थानीं असणारी एखादी व्यक्ति महाराष्ट्रांत होऊन गेली असेल अशी शंका सुद्धा येणार नाही." खांडेकर अर्थातच कोल्हटकरांना एक थोर आणि प्रभावी नाटककार समजतात. नवलाची गोष्ट ही की—"प्रेक्षकांच्या भावनेला अंकित करण्याचें कसब गडकरी–खाडिलकरांना जसें साधलें तसें तें कोल्हटकरांना कधींच साध्य झालें नाही;" "त्यांच्या नाटकांत उग्र, उत्कट अथवा उदात्त भावनांचा संघर्ष, दोन तीन अपवाद वगळले तर, कधीच प्रगट झाला नाही;" "यशस्वी नाटककार व्हायला लागणाऱ्या अनेक गोष्टींचा त्यांच्यांत अभाव होता यांतहि शंका नाही;" "कुठलीहि गोष्ट संवादरूपाने सांगितली की तिला नाट्याचें स्वरूप येतें, या बालबोध कल्पनेच्या पोटीं त्यांनी प्रत्येक नाटकांत असे नाट्यशून्य प्रवेश लिहिले आहेत"—अशा तऱ्हेचीं कोल्हटकरांच्या नाटकांच्या नाट्यहीनतेबद्दल ग्वाही देणारीं अनेक विधानें करूनसुद्धा खांडेकर कोल्हटकरांच्या नाट्यक्षेत्रांतील श्रेष्ठत्वाबद्दल आग्रह धरतांना दिसून येतात! कोल्हटकरांच्या नाटकांतले त्यांच्या नाट्यशून्यतेची खात्री पटवून देणारे सगळे दोष दाखवून सुद्धा खांडेकर कोल्हटकरांच्या नाट्य (?) कर्तृत्वाचे मुक्तकंठाने गोडवे गातात. त्यावेळीं असें वाटतें की जणु कांही कृतज्ञ भक्ताचें मन आणि प्रामाणिक टीकाकाराचें मन अशीं खांडेकरांचीं 'दोन मनें' एकाच वेळीं बोलूं लागतात! तें कांही असो. आपला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुख्य मुद्दा हा की ज्यांची रसिकता चांगली परिणत झालेली आहे -अशा फडके-खांडेकरांसारख्या समीक्षकांची कोल्हटकरांच्या नाटकांबद्दलची मतभिन्नता पाहिली म्हणजे सर्वसाधारण वाचकांचीं मनें गोधळांत पडतात !

कोल्हटकरांच्या नाटकांबद्दल आणखी एका मार्मिक नाट्यरसिकाचा अभिप्राय येथे उद्धृत करण्याचा मला मोह होतो. 'मखमलीच्या पड्द्या'चे लेखक वसंत शांताराम देसाई हे ते नाट्यरसिक होत. ते स्वच्छच सांगतात की "कोल्हटकरांचीं नाटकें मीं पंचवीस वर्षांपूर्वी वाचलीं त्यावेळीं मला आवडलीं नाहीत आणि अद्यापिहि आवडत नाहीत." माडखोलकरांचें गुरुवर्य कोल्हटकरांबद्दलचें मत न सांगतांहि कळून येण्यासारखें आहे. त्यांनी तर अच्युतरात्र कोल्हटकरांप्रमाणे आपल्या गुरूचें जगज्जेत्या नेपोलियनशीं साम्य दाखविलें आहे !

माडखोलकर आणि खांडेकर हे दोघे गुरुबंधु. कोल्हटकरांना आपल्या सगळयाच मर्यादांची पूर्ण जाणीव होती, असें माडखोलकर सांगतात— तसें त्यांनी नुकतेंच ३० मे १९५२ ला नागपूर नभोवाणीवर दिलेल्या भाषणांत सांगितलें ! आणि 'मायाविवाह' या आपल्या अत्यंत निरस आणि भिकार नाटकाचा सामान्यपणा कोल्हटकरांच्या लक्षांत येऊं शकला नाही, याबद्दल खांडेकर आश्चर्य व्यक्त करतात !

तेव्हा, ही अशी गंमत आहे ! एका टीकाविषयीभूत साहित्यिकाच्या कर्तृत्वाबद्दल चार सन्मान्य समीक्षकांचीं हीं अशीं चार मतें आहेत ! यांपैकी खरें मत कोणतें. हा सामान्य वाचकाच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. त्याचें उत्तर एकच आहे. तें हें की प्रत्येक वाचकाने अभिजात वाङ्मयीन कृतींच्या परिशीलनाने आपली रसास्वादक्षमता वाढवून मग तिच्या बळावर इतर कोणत्याहि वाङ्मयीन कृतीसंबंधी आपलें स्वतःचें मत बनवावें ! ———

झुळुकेस

[छंद—जीवनलहरी]

तूं कुण्या देशाची
सांग मला परी
कधी सरेल ही
तुझी मुशाफरी ! १

तुझ्या गुदगुल्या
जलाशया निळया
त्यांच्या वदनांवरी
लाटांच्या त्या खळया ! २

फुलांच्या भोवती
पानांचा पहारा
कोपरखळयांचा
करूनिया मारा ! ३

त्यांना देउनिया
गोड गोड थापा
मारिशी गंधाच्या
धनावरी छापा ! ४

लुटलेलें धन
तंट्याभिल्लापरी
देशी तूं भेटेल
जो जो रस्त्यावरी ! ५

फटींतून हळू
घरांत शिरून
दचकाविशी त्या
सांजवाती सान ! ६

घुम्या पर्वतांचीं
गुपितें काढाया
दऱ्यांकपाऱ्यांत
मारिशी तूं फेऱ्या ! ७

उडत्या खगांशीं
तुझी शिवाशिव
ओलांडशी कैक
देशांची तूं शिव ! ८

हातावरी तुरी
पळशी देउनी
वादळी वाऱ्याच्या
धाकट्या भगिनी ! ९

खांद्यावरील ते
पदर लाजरे
खाली तूं पाडून
पळशी चटोरे ! १०

थकल्या देहांस
उद्विग्न मनास
शांतविती खास
तुझे करपाश ! ११

साऱ्या मुलुखाची
जरी तूं खट्याळ
परी भिठी तुझी
झुळुके प्रेमळ ! १२

—भा. आ. पांढरीपांडे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समीक्षा

सुश्लोक मानस*

★

श्रीहर्षाच्या नैषधावर आधारलेल्या रघुनाथ पंडिताच्या 'दमयंती स्वयंवरा'चा स्पृहणीय अपवाद वगळला, तर प्राचीन मराठी कवींपैकी कुणीहि संस्कृत साहित्यांतील अभिजात काव्यें मराठींत आणलीं नाहीत. तो प्रयत्न इंग्रजी राजवटीच्या प्रारंभीं चिपळूणकर, राजवाडे, लेले आदि पंडित कवींनी केला. परंतु इंग्रजी भाषेच्या वाढत्या वर्चस्वामुळे व तिच्या नवीन साहित्याशीं उत्तरोत्तर अधिकाधिक आलेल्या संपर्कामुळे पंडित कवींची परंपरा फार दिवस टिकाव धरूं शकली नाही. ती परंपरा खंडित झाल्यानंतर आज जवळ जवळ पन्नास पाऊणशें वर्षांनी डॉ. श्रीखंडे यांनी तो प्रयत्न भगिरथाच्या ईर्षेने पुन्हां नेटानें चालविला आहे तो खरोखरच अभिनंदनीय आहे. डॉक्टरांनी आतांपर्यंत सुश्लोक गोविंद, सुश्लोक कुमार, सुश्लोक मेघ व कुंदमाला हे पांच अनुवाद महाराष्ट्रीय रसिकांसमोर ठेवले आहेत. ते पाहून 'पंडित परंपरेंतील निखळलेला दुवा' असें त्यांचें वर्णन कुणी केल्यास तें खचित अनुचित ठरणार नाही. पुन्हां हा दुवा समर्पक अनुवाद व सरस भाषासरणी यांबाबत चिपळूणकरांची आठवण करून देतो हें विशेष आहे.

संस्कृत साहित्य कालदृष्ट्या पुरातन झालें असलें, तरी त्यांतील अवीट रसवत्ता व अपार सुंदरता आजमितीसहि नूतन आहेत. डॉक्टरांच्या सरसरमणीय अनुवादांनी महाराष्ट्रसाहित्यांत प्रौढ व सालंकृत काव्यग्रंथांची भर पडली असून त्याचें वैभव वाढलें आहे. शिवाय संस्कृत भाषेशी परिचय नसल्यामुळे जे वाचक तिच्या वाङ्मयांतील रसाच्या आस्वादास पारखे झाले आहेत त्यांना मराठी अनुवादाच्या द्वारें तो रस सहज प्राप्त व सुसेव्य झाला आहे. राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या या युगांत संस्कृत भाषेच्या व साहित्याच्या अभ्यासाचें महत्व अधिकाधिक पटत आहे. तेव्हा अशा काळीं त्या भाषेंतील साहित्याशीं तोंडओळख व्हावी या दृष्टीने माध्यम म्हणूनहि मराठी अनुवाद आवश्यक आहेत. ते करणारे एक धुरीण म्हणून माझ्या सारखे असंख्य वाचक डॉक्टरांना दुवा देतील.

अनुवाद करण्याच्या कसोटीबाबत आणखी एका दृष्टीने डॉक्टरांची धन्यता वाटते. ती अशी कीं त्यांचा वैद्यकीचा व्यवसाय हा मूळांतच शुष्क व रुक्ष. त्याला रसाळ कविता कशी अनुकूल असणार ? पण डॉक्टरांनी आपल्या सुरस व सुंदर अनुवादांनीं अशक्य कोटींतील ही गोष्ट शक्य करून दाखविली आहे. आधुनिक मराठी कवींपैकी बहुतेक कवी पेशाने शिक्षक होते. कर्नल कीर्तिकर व माधवानुज हेच काय ते डॉक्टर होते. श्रीखंड्यांमुळे त्या संख्येंत भर पडली असली, तरी ती एका हाताच्या बोटांवर मोजण्या इतपतहि पुरी नाही. परंतु धंद्याने डॉक्टर असणाऱ्या तिघांहि कवींनी आधुनिक मराठी कवितेवर आपआपल्या वैशिष्टयांची छाप ठेवली आहे हें विशेष आहे.

---

* भाग पहिला, प्रथम सोपान—बालकाण्ड, रचयिता डॉ. रा. चिं. श्रीखंडे, एम्. बी. बी. एस्., मंगळवार, कोल्हापूर, मूल्य रु. ५.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'सुश्लोकमानस' हा डॉक्टरांचा अगदीं अलिकडचा प्रयत्न अनुवादात्मक असला, तरी पूर्वीच्या प्रयत्नांपेक्षा त्याची दिशा थोडीशी निराळी आहे. 'सुश्लोक-मानस' हा पूर्वीच्या अनुवादांप्रमाणे संस्कृतग्रंथाचा अनुवाद नाही. तो प्रातःस्मरणीय प्राचीन हिंदी कवि गोस्वामी श्री तुलसीदासजी यांच्या 'रामचरितमानस' या हिंदी वाङ्मयांतील सर्वश्रेष्ठ व सर्वोत्कृष्ट ग्रंथाचा मराठी अनुवाद आहे. आणि चालू काळीं हिंदी ही राष्ट्रभाषा या पदवीस प्राप्त झाली असतांना तो प्रसिद्ध व्हावा यांत औचित्यहि आहे. गुँसाई तुलसीदासजींचा ग्रंथ अयोध्येच्या आसपास प्रचलित असणाऱ्या हिंदी बोलींत म्हणजे अवधी भाषेंत आहे. उत्तरेकडले तुलसीदास व दक्षिणेंतले आपले एकनाथ समकालीन होते. तुलसीदासांप्रमाणे एकनाथांनीहि रामायण रचलें आहे तुलसीदासांसंबंधी ज्याप्रमाणे 'चित्रकूटके घाटपर भई संतनकी भीर। तुलसीदास चंदन घिसै तिलक करै रघुवीर' हा दोहा सर्वश्रुत आहे; त्याचप्रमाणे एकनाथांसंबंधी 'श्री एकनाथसदनी माधवजी सर्व काम हें करितो। स्वकरें चंदन घाशी गंगेच्या खांदें कावडी भारतो' ही त्याच अर्थाची 'आर्या' सर्वप्रसिद्ध आहे. यांवरून या दोघां भक्तकवींना परमेश्वरप्राप्ति झाली होती व दोघेहि सर्वसाधारण जनतेंत अत्यंत प्रिय होते असें दिसतें. तुलसीदासांचा महिमा महिपतीने 'भक्ति विजया'तील एका अध्यायांत वर्णिला असून मोरोपंतांनी त्यांच्या 'रामचरितमानसा'तील अलोट माधुर्याविषयी 'याचें सुप्रेमभवन कवन निवविते सदा बुधा सरसें। हें जों जों सेवावें, तों तों सेवावेंचि गमे, सुधारससें,' अशी प्रशंसा केली आहे. तात्पर्य, गुँसाई तुलसीदासजी हे महाराष्ट्रांत फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहेत. डॉक्टरांच्या अनुवादापूर्वी त्यांच्या 'रामचरित मानसा'चे तीन मराठी अनुवाद झाले आहेत त्यांपैकी भोपटकर व प्रज्ञानंद सरस्वती यांचे अनुवाद समपद्यात्मक असून जामदार यांचा अनुवाद गद्यात्मक आहे. जामदारांच्या गद्यावरूनच श्रीखंडे यांनी आपले श्लोक रचिले आहेत. अर्थगौरव आणि पदलालित्य या दृष्टींनी प्रौढ व गंभीर श्लोकरचना इष्ट असली, तरी, सर्वसामान्य जनांत ती मान्य व्हावी व प्रसार पावावी या दृष्टीने फारशी उपयुक्त नाही. श्लोकरचना ही सुशिक्षितांत व साक्षरांत प्रिय होते. परंतु साधारणांना ती बहुधा सुगम व सुलभ वाटत नाही. हेंच सत्य दृष्टीसमोर ठेवून तुलसीदासांनी आपल्या काव्यांत 'दोहा, चौपाई, सोरठा व हरिगीतिका' या सोप्या व साधारण गळ्यावर म्हणतां येण्याजोग्या मात्रिक छंदांचा उपयोग केला आहे. या छंदाची अकराव्या तरंगांत त्यांनी स्तुतिहि केली आहे. तिचा मराठी अनुवाद डॉक्टरांनी 'चौपाइ वारिरुहपत्रसमा विशाला' अथवा 'दोहे नितांतमधु सोरठ पद्यजाती। ते छंद सुंदर रसाळ विराजताती' असा श्लोकांत केला आहे. तो सुंदर व समर्पक असला, तरी यथार्थतेच्या दृष्टीने विपरीत वाटतो. त्याच छंदांत तो सार्थ वाटला असता. डॉक्टरांनी अनुवादांत मूळांतलेच छंद योजले नाहीत म्हणून त्याला कांही कमीपणा आला आहे असें मात्र नाही सांगायचा मुद्दा येवढाच कीं मूळ छंदांत सर्वसामान्य लोकांना भावार्थ सहजासहजीं हृदयंगम झाला असता.

डॉक्टरांनी ग्रंथाच्या आरंभीच्या 'निवेदन, पुरस्कार व आभार'मध्यें त्यांना जामदारांनी पाठविलेलें 'उत्तर' दिलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं 'तुलसीदासांना ठराविक वृत्तांची योजना कोठे कोठे अनिश्चितपणें देखील कोणत्या उद्देशाने केली असावी?' असा डॉक्टरांचा जामदारांना प्रश्न होता. त्याचें जामदारांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डॉक्टरांनी केलेली विविध वृत्तांची रचना लक्षांत घेऊन मोठें विनतोड उत्तर दिलें आहे. ते लिहितात, ' प्रश्नकर्त्यांनेच जेथें प्रश्नउत्तर दिलें तेथें दुसऱ्या उत्तराची चाड काय ? ' वस्तुतः तुलसीदासांनी ठराविक वृत्तांची योजना केली त्यामागें एक इतिहास आहे. मोंगल साम्राज्याच्या भरभराटींत म्हणजे अकबराच्या ऐन राज्यत्वकालांत तुलसीदास होऊन गेले. त्यांच्यापूर्वी सुलतानींत उत्तर प्रदेशांत जायस या ठिकाणीं मालिक मुहम्मद जायसी या नांवाचा एक सुफी संत कवि होऊन गेला. या मुसलमान कवीनें ' पद्मावत ' या नांवाचा ग्रंथ दोहा व चौपाई छंदांत रचला असून रामचरितमानसपूर्वी या ग्रंथाचा उत्तर प्रदेशांत फार प्रसार होता. 'पद्मावतांत' सिंहलद्वीपची राजकन्या पद्मिनी चितोडगडच्या भीमसिंहाशीं विवाहबद्ध होते. म्हणजे जीव व शिव यांचें ऐक्य होतें असा रूपकात्मक कथाभाग आला असून त्यांच्या ऐक्याच्या आड अल्लाउद्दीन हा विकार येत असतो असा प्रसंग चितारला आहे. मध्यां इतिहासांत अल्लाउद्दीन खिलजीनें पद्मिनीचें प्रतिबिंब आरशांत पाहिलें म्हणून जी कथा दिलेली असते. ती वास्तविक जायसीच्या काव्यांतूनच उगम पावली आहे. जबलपूरच्या महाकोसल महाविद्यालयांतील इतिहास विभागाचे प्राचार्य डॉक्टर लाल यांनी या विषयावर 'पद्मावत एक मिथ्' हा प्रबंध लिहिलेला प्रसिद्ध आहे. जायसीच्या ' पद्मावता ' मुळे उत्तर प्रदेशांतील खेड्यापाड्यांतून मुसलमानांच्या सूफी सम्प्रदायांतील तत्त्वांचा प्रसार होत होता. त्याला पायबंद बसावा या उद्देशानें तुलसीदासांनी आपलें रामायण रचलें. आणि त्यांत त्यांना न भूतोनभविष्यति असें घवघवीत यश प्राप्त झालें आज देखील भारतांत तुलसी रामायणाचीं जितकीं पारायणें होतात तितकीं कोणत्याच दुसऱ्या ग्रंथाचीं होत नाहीत.

'पद्मावता' प्रमाणेंच चौपाई व दोहावृत्तांत रामायण रचून तुलसीदासांनी हिंदुसमाजापुढें उच्च आदर्श ठेवला. 'प्राण जाइ पर बचन न जाई' अशा बाण्याचा दशरथ; सुनांना कन्याप्रमाणे पुढ्यांत घेणाऱ्या त्याच्या राण्या; आज्ञाधारक, एकपत्निव्रत पालन करणारा, त्यागी राम; पतिव्रता सीता; सेवारत लक्ष्मण, भक्त भरत, दास हनुमान इत्यादिकांच्या चारित्र्याचें व चारित्र्याचें चित्रण करून तुलसीदासांनी आपली काव्यकृति अजरामर करून ठेविली आहे. आजदेखील त्यांची ही कलाकृति रामलीलेच्या रूपानें लक्षावधि लोकांचें मनोरंजन करतांना व त्यांना आदर्शाचे पाठ देतांना दृष्टीस पडते. उत्तर प्रदेशाच्या पूर्वेकडचा बंगाल व पश्चिमेकडचा पंजाब बहुसंख्येनें मुसलमान बनला. पण सहा शतकें मुसलमानी सत्तेखाली राहूनहि उत्तर प्रदेश हिंदूच राहिला. याला कारण त्या प्रदेशांत झालेले तुलसीदास सूरदास आदि संत कवि होत या अर्थाचें एक विधान मागें एकदां एका सभेंत मध्यप्रदेशाचे माजी गृहमंत्री द्वारकाप्रसाद मिश्र यांनी केलें होतें. तें पूर्णपणें सत्य आहे. तुलसीदासांनी आपला धर्म व आपली संस्कृति यांची ज्योति रामायणाच्या रूपानें समाजांत अखंड तेवत ठेविली यांत कांही शंका नाही.

जायसीची भाषा गांवढळ असल्यामुळें त्याचा 'पद्मावत' ग्रंथ मागें पडला. आणि त्याची जागा साहित्यिक सौंदर्यानें नटलेल्या गुँसाईजींच्या रामचरितमानसानें घेतली. 'रामचरित मानस' अवधी भाषेंत आहे. ती मराठीप्रमाणेंच नियमबद्ध व कणखर आहे परंतु तुलसीदासांची 'विनयपत्रिका'दि इतर काव्यें ब्रज भाषेंत आहेत. ती भाषा अतिशय कोमल व लवचिक आहे. या स्वभावभेदामुळें दोहा हा छंद अवधीला अनुरूप ठरतो तर सवाई हा छंद ब्रज भाषेला योग्य होतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१०९५२
बुनंजे

तुलसीदासजींचें दोन्ही भाषांवर सारखेंच प्रभुत्व होतें. ते सदाचारसंपन्न संत व उच्च कोटीचे प्रतिभावान कवि होते. त्यांच्या प्रतिभेवर गीता, भागवत, उपनिषदें इत्यादिकांचे संस्कार घडलेले होते. त्यांचे भाव उत्स्फूर्त असले, तरी विशुद्ध आहेत, रस उत्कट असले, तरी संयत आहेत आणि आविष्कार स्वाभाविक असला, तरी सुसंस्कृत आहे. त्यांच्या कल्पना एकजात उदात्त व उच्च आहेत. या गुणसमुच्चयामुळे त्यांचें रामायण असंख्य भाविकांच्या गळ्यांतलें रत्न होऊन बसलें आहे. 'जागिये रघुनाथकुंवर पंछी बन बोले।' ही महाराष्ट्राच्या परिचयाची त्यांची 'भूपाळी'च घ्या. 'सकाळ झाली' ही गोष्ट 'पंछी बन बोले' या ध्वन्यात्मक वाक्याने कशी सूचित केली आहे तें बघा! सीता, राम व लक्ष्मण नदीपार जातांना गुहाच्या नौकेंत बसतात. रामाच्या चरणस्पर्शाने शिळेंतून अहल्येसारखी सुंदर स्त्री उजळून आली. आपल्या नौकेची स्थिति तर तशी होणार नाही ना अशी धास्ती घेऊन गुह रामाजवळ केविलपणे आपली ती शंका प्रकट करतो. त्या प्रसंगाचें चित्र दोन ओळींत रेखाटतांना गुँसाईजींनी जी भक्तिभावयुक्त भाषा योजिली आहे व मर्यादा-पुरुषोत्तम श्रीराम आणि त्याची मर्यादशील पत्नी सीतादेवी यांचीं जीं सूक्ष्म नख-चित्रें रेखाटलीं आहेत, त्यांत त्यांचें मानसशास्त्राचें ज्ञान व समाजशास्त्राचें आदर्शभूत जीवन सुंदर रीतीने व्यक्त झालें आहे. गुहाच्या शंकेने राम नुसतें हंसतात. सीतेलाहि हंसूं येतें. पण ती दंतपंक्ति दाखवत नाही. ती केवळ लक्ष्मणाकडे पाहते. तेंहि त्याच्या शरीराकडे, मुद्रेकडे नाही;—

(सोरठा)—सुनि केवटके बैन, प्रेम लपेटे अटपटे
बिहंसे करूनाऐन, चितै जानकी ललनतन.

तुलसीदासजींच्या निरनिराळ्या काव्यगुणांसंबंधीं बरेंच विवेचन करतां येईल. पण इथे त्यास अवकाश नाही. त्यांची कुणाशीं तुलना करणेंहि योग्य होणार नाही. त्यांच्या तोलाचे एकमेव कवि तेच होते. मागें एकदां 'रामचरितमानस' व मिल्टनचें 'पॅरेडाइझ लॉस्ट' या काव्यांची तुलना करण्याचा अप्रयोजकपणा एका विद्वानांनी केला होता. त्यांना तुलसीदासांच्या काव्याच्या एका भक्ताने अत्यंत मार्मिक उत्तर दिलें होतें ;— 'बढ़ी पछांई सभ्यता, हममें हुआ विकास
मिल्टनवाली आँखसे, तुले न तुलसीदास'

उत्तरांत श्लेष आहे. त्याचा आशय असा :— 'मागून आलेली किंवा पाश्चात्य संस्कृति पुढे येतांच जणूं कांही आमचा उत्कर्ष झाला! पण मिल्टनच्या काव्यदृष्टीने किंवा मिल्टनला डोळे नव्हते त्याप्रमाणे आंधळ्या दृष्टीने जे तुलसीदासांचें काव्य पाहतील, त्यांना हें कळलें पाहिजे कीं डोळ्यांच्या दोन पारड्यांत मिल्टन व तुलसीदास हे ठेवल्यास त्यांची तुलना अशक्य आहे. सारांश, तुलसीदासांच्या तोलाचा मिल्टन नाही!

आपल्याकडील ज्ञानेश्वरादि संतांचीं काव्यें निव्वळ तात्त्विक आहेत. परंतु उत्तरेकडील तुलसीदासांचें हें काव्य कथात्मक आहे. शिवाय तें गेय आहे हें विशेष आहे. बेचाळिसाव्या तरंगांत सीतादेवीने पार्वतीचें 'जय जय जय गिरिराज किशोरी' म्हणून जें स्तवन केलें आहे, तें पुष्कळांनी मालकंस रागांत आळवितांना कै. विष्णु दिगंबर पलुस्करांना ऐकलें असेल. तुलसीरामायण विशेष प्रसारित होण्याचें एक कारण त्याची गेयताहि आहे. मला स्वतःला 'तुळशी'चीं कांही 'पवित्र पत्रें'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सेवन करण्याचें व कांहीं 'मंगल मंजऱ्या' हुंगण्याचें सद्भाग्य अगदी लहान वयांत प्राप्त झालेलें आहे. बालपणीं अजमीरास माध्यमिक शिक्षण घेत असतांना माझ्या वर्गाला लावलेल्या पाठ्य पुस्तकांत तुलसीरामायणांतील 'अंगद रावण संवाद' 'परशुराम लक्ष्मण संवाद', 'सीतेचें रामाबरोबर वनाला जाणें,' 'वर्षावर्णन' 'शरद् वर्णन,' इत्यादि उतारे होते. पुढे प्रवेश-परीक्षेसाठी मीं हिंदी हा ऐच्छिक विषय घेतला होता. तेव्हा 'राम चरित मानस-संक्षिप्त' हें एक पाठ्यपुस्तक होतें. या अनायास अभ्यासामुळे गोस्वामी श्री तुलसीदासजींच्या प्रतिभेचे संस्कार माझ्या बालस्वभावसुलभ व संवेदनशील अंतःकरणावर वज्रलेप झाले आहेत. आज पाव शतकानंतर डॉ. श्रीखंड्यांचा हा मराठी अनुवाद वाचतांना ते संस्कार पुनःश्च रोमांचित झाले असल्यास नवल नाही !

डॉक्टरांचा 'रामचरित मानसा'चा हा मराठी अवतार मूळाला इतका धरून आहे कीं अनुवादावरून मूळ किंवा मूळावरून अनुवाद कुणीहि कसाहि पडताळून पहावा. 'बंदहुँ गुरुपद कंज। कृपासिंधु नररूप हरि' या सोरठ्याचा डॉक्टरांचा 'मी वंदितों नरहरी गुरुराया माझा। वाटे हरीच नररूप कृपाधिराजा' हा अनुवाद इतका तंतोतंत आहे कीं मूळांतील 'नररूप हरि' यांतील श्लेष ध्यानांत येण्यास अडचण पडत नाही. तेराव्या तरंगांतील 'भरद्वाज मुनि बसहिं प्रयागा। तिन्हहिं रामपद अति अनुरागा' या चौपाईचें 'होते भरद्वाज मुनि प्रयागीं। अतीव जे रामपदानुरागी' हें श्लोकात्मक अनुसरण हुबेहूब नाही असें कोण म्हणेल ! एकेचाळिसाव्या तरंगांत राम व लक्ष्मण यांच्या सौंदर्याचें वर्णन करतांना 'गिरा अनयन नयन बिनु बानी' ही एक अत्यंत अभिनव सुंदर कल्पना आली आहे. सौंदर्य डोळयांना अनुभवण्यास सांपडतें. त्याचें वर्णन करायचें तर डोळयांना वाणी नाही आणि वाणीनें तें करूं म्हटलें तर तिला प्रत्यक्ष पाहण्यास डोळे नाहीत ही ती कल्पना होय. या कल्पनेचें 'वाणीस ना नयन, ना नयनांस वाणी!' हे डॉक्टरांनी केलेलें रूपांतर मूळाइतकेंच मधुर आहे. तें पाहून तर मी बेहद्द खूश होऊन गेलों !

डॉक्टरांनी जेथे जेथे उपजाति अथवा अनुष्टुपासारखीं सोपीं वृत्तें वापरलीं आहेत, तेथे तेथे प्रसाद विशेष प्रमाणांत जाणवतो. त्याच्या प्रवाहांत स्वभावोक्ति सारखे साधे अलंकारहि सहजगत्या वाहिले आहेत. वानगीदाखल तेविसाव्या तरंगांत पार्वती शंकरांना रामकथा विचारीत आहे तोच भाग पाहा. प्रसाद कसा ओतप्रोत वाहात आहे. पार्वती म्हणते,—'ऐकूनि तुमची वाणी रूपिणी जणुं कौमुदी। शरदातप लोपे मन्मोहरूपक्षणामधीं। कृपेने आपुल्या गेला विषाद मम सर्वथा। प्रसादें प्रभुपादांच्या पावलें मी प्रसन्नता ' "असें मी अज्ञही नाथ! आपुली लीन किंकरी। स्वभावेंचि जडा बुद्धि स्त्रियांची प्रथिता जरी". डॉक्टरांनी या काव्यांतील निरनिराळे भाग 'तरंगां'त विभाजित करण्याची जी कल्पना मुकुल (म्हणजेच शुक्ल) यांच्या-कडून घेतली आहे, ती संदर्भाच्या दृष्टीने सोयीची आहे. मात्र अनुवादांत डॉक्टरांनी जीं भिन्न भिन्न वृत्तें योजिलीं आहेत त्यांचा नामनिर्देश केलेला नाही. त्यामुळे कोणतें वृत्त कितीदा योजलें आहे हें सहजासहजीं कळण्याची सोय राहिलेली नाही. क्वचित् कांही श्लोकांत डॉक्टरांनी दुसऱ्या व चवथ्या चरणांचीं यमकें साधलीं आहेत त्यामुळे कृत्रिमता टळली आहे व लालित्य कायम राहिलें आहे. मूळांतील सुंदर स्थळें अनुवादांत तशींच्या तशींच साकार करण्यांत डॉक्टरांनी कमालीचें कौशल्य प्रकट केलें आहे. उदाहरण म्हणून रामजानकी विवाहाचें हें वर्णन पहा;—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

११९५२

'पाहोनी तशि ती मनःस्थिति तिची तीतें सख्या बोलती
"बाळे गे ! जयमाळ सुंदर गळां तूं रावबा ! घाल ती"
ऐकोनी वच पाणिपद्म युगलें ती उंचवीं माळ ती !
प्रेमाने विवशा करांतुन अशा ना ती सुटे खालती !

तैं भासले जलजयुग्मं जणों सनाल । तें भीत घालि शशितें जयमाळ लोल ॥
गाती सख्या बघुनि तीं छवि तों सुनीता । श्रीरामकंटि वितरी जयमाळ सीता ॥

डॉक्टरांनी जामदारांच्याच गद्याचें अनुसरण केलें असल्यामुळे क्वचित् त्यांचा अनुवाद पटत नाही. 'मूकं करोति वाचालं' याचें तुलसीदासांनी 'मूक होई वाचाल' असें रूपांतर केलें आहे. त्याचें 'ज्याची कृपा करि जडासहि वागधीश' हें डॉक्टरांचें भाषांतर पटत नाही. त्यांत भावार्थ आहे. पण 'मूक' या शद्वास योजलेला 'जड' हा प्रतिशद्व यथार्थ वाटत नाही. त्याचप्रमाणे बेचाळिसाव्या तरंगांत पार्वतीच्या स्तवनांतील 'जगतजननि दामिनि द्युति गाता' या चरणाचें 'विश्वासि तूंचि जननी अति दिव्य होसी' हें जें भाषांतर केलें आहे तें योग्य वाटत नाही. पार्वतीच्या गात्रांवर विजेच्या द्युतीचा आरोप करून तुलसीदासांनी त्यांची उज्वलता, धवलता व चपलता या तीन्ही गुणांना अभिव्यक्ति दिली आहे. अनुवादांत तशी अभिव्यक्ति नाही. तद्वत्च पार्वतीने सीतेला जो आशिर्वाद दिला, तो मूळांत असा आहे;—

'मन ज्यांहि राचो मिलहिं सो वर सहज सुंदर सांवरो
करुनानिधान सुजानशील सनेह जानत रावरो'

या दोन चरणांत रामाचें गुणवर्णन करतांना शील, स्नेह इत्यादि जे महत्वाचे शद्व आले आहेत, ते 'करुणासागरें मिळेल सुचतुर जाणत तव गुण आगळा' या अनुवादांत उतरलेले नाहीत. जामदारांनी 'रावरो' या शब्दाचें 'राजबिंडा' असें मोठें समर्पक भाषांतर केलें आहे. डॉक्टरांच्या अनुवादांत तो शब्द अजिबात गळला आहे.

डॉक्टरांनी 'तरंगां'ची कल्पना जशी मुकुलांकडून घेतली, तसे केवळ जामदारांच्या भाषांतरावर विसंबून न राहतां कांही पाठभेद अन्य प्रतींतून स्वीकारले असते, तर अनुवादाचा पाक अधिकच मधुर झाला असता. एकुणपन्नासाव्या तरंगांत 'देखाराम नयेके मोरे' असा मूळांत एक चरण आहे. त्याजागीं अनुवादांत 'देखेचिराम, तंव हे जणु चाप भग्न' हा चरण आहे. पण तो बरोबर नाही. धनुर्भंगामुळे परशुराम क्रोधाविष्ट झाले. त्यांचा व लक्ष्मणाचा कडाक्याचा वाद झाला. लक्ष्मण म्हणाले, "काछतिलाभ जीर्न धनु तोरे। देखाराम नयेकेमोरे" म्हणजे 'जीर्णधनुष्य तोडल्याने हानि तरी कोणती आणि लाभ तरी कोणता ? तें धनुष्य नवीन आहे अशा भरवशानें रामांनीं तोडलें ! मूळांतील हा अर्थ 'ही लाभहानि कशि तोडुनि चाप जीर्ण ? । देखेचि राम, तव हें जणु चाप भग्न' या अनुवादांत उतरलेला नाही. त्याचप्रमाणे याच तरंगांतील 'यहाँ कुम्हड बनिया कोउ नाहीं। जो तर्जनी देखत मुरझाई' या चौपाईचें 'ना भोपळा कुणिहि येथ अपक्व लाल। जो तर्जनी तुकावितांहि खरें मरेल' हें भाषांतरहि बरोबर नाही. लाल भोपळ्याला 'कुम्हडा' म्हणतात हें खरें. परंतु 'कुम्हडना' किंवा 'कुम्हलना' अथवा 'कुम्हलाना' म्हणजे कोमेजणें. 'कुम्हडबनिया' म्हणजे 'कोमेजणारी वेली अर्थात् लाजाळू.' लक्ष्मणाला परशुराम वारंवार परशु दाखवून

१६६३

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

धाक दाखवूं लागले. तेव्हा लक्ष्मण त्यांना म्हणाले कीं, ‘ जिच्याकडे तर्जनीने संकेत केला कीं जी कोमेजून जाते अशी लाजाळूची वेली इथे नाही.’ लाजाळूप्रमाणे तर्जनी दाखविली कीं भोंपळयाचा वेल सुकतो असा कांही संकेत नाही. तेव्हा अनुवादांतील अर्थ सदोष आहे. अर्थात् या दोषास डॉक्टर साहेब जबाबदार नाहीत. जामदारांनाहि दोष देतां येत नाही. अलिकडे हिंदी साहित्यांत नित्य नव्या संशोधनपर ग्रंथांची भर पडत आहे. त्या सर्वांचा सूक्ष्म अभ्यास करण्याची सवड सर्वांना असणें शक्य नाही. रूपवतीच्या लावण्याची जी परीक्षा करतात, ती कांही तिचा एक एक अवयव मोजून मापून करीत नाहीत. तिच्या एकंदर ठेवणींत प्रतीतमान होणारा सौंदर्याचा जो विभ्रम त्यावरून तिच्या रूपाचें मूल्यमापन करतात. रसिकांना तीच कसोटी मान्य आहे. काव्याला तीच कसोटी लावतात. आणि त्या कसोटीवर श्रीखंड्यांची ही कविताकृति जर घासून पुसून पाहिली तर ती बावनकशी ठरते हें मी छातिठोकपणाने सांगतों. वस्तुतः अशा अमूल्य काव्यांचा विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत समावेश होणें आवश्यक आहे. डॉक्टरांची या कृतीबद्दल मी पाठ थोपटतों आणि त्यांना म्हणतों कीं, “ डॉक्टर ! पुढील ‘ कांडें ’ समोर आणा. त्यांच्यांतला रस चाखण्यास व चोखण्यास आम्ही सारे अधीर आहोंत.”

ओढ

★

बाबांचा मी धरूनी हात,
बालपणीं गाणें गात,
पुरविती कोड, मला बाहुलीची ओढ ॥१॥

होता सायंकाल जधीं,
माय माझी दारीं उभी,
खाऊ देई गोड, मना माउलीची ओढ ॥२॥

माझें छानसें घरकुल,
मुलें शोभवितीं कुल,
सौख्या नाही जोड, लागे संसाराची ओढ ॥३॥

मृत्यू गळा घाली पाश,
स्वकीयांची तुटे आस,
आतां नाही तोड, परि तान्हुल्यांची ओढ ॥४॥

—सौ. सरस्वती सुभेदार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नादलुब्धाचीं स्मृतिचित्रें

पद्मा शाळीग्राम

मधुकर मंगरूळकर

★

कांही ठराविक राग ऐकायचे असले तर ते ठराविक गायकांच्या तोंडूनच ऐकावे अशा प्रकारचा एक अलिखित नियमच ठरून गेला आहे. मास्तर कृष्णरावांचा अडाणा 'सुंदरी मोरी काहे—'; खां साहेब अब्दुल करिमखां साहेबांचा वसंत "फगवा ब्रिज देखन"; भीमसेन जोशांचा 'एरि माई पिया' हा शुद्ध कल्याण, किंवा अमीरखां साहेबांचा दरबारी !......दुसऱ्या गायकांच्या तोंडीं हे राग शोभत नाहीत असें वाटण्याइतपत त्या गायकांचा आणि रागांचा पगडा रसिकमनावर आहे. राम मराठे किंवा सुरेश हळदणकर गात असताना त्यांची एखादी विशिष्ट फिरत आली कीं लोक ओळखतात, "ही लकब नारायणरावांची (बालगंधर्व) बरं कां—" तितपत कांही गायकांनी जणू ठराविक रागांना आपलें पितृपद बहाल केलें आहे. चेहरा मोहरा ओळखून घ्यावा.

याच रागांच्या मालिकेंत आणखी एका रागावरून पद्मा शाळीग्राम यांची मला आठवण येते. तो राग म्हणजे भूप. पांच स्वरांचा, आटोपता संसार असणारा, एखाद्या एकलकोंड्या प्रौढ गंभीर माणसासारखी भूप रागाची प्रकृति. पण तसल्या विरक्त रागालाहि पद्माबाईने नरम केलें आहे, वय विसरून उड्या मारायला लावलें आहे. मीं पद्मा शाळीग्राम यांच्या पूर्वीच्या आणि नंतरच्या म्हणजे वारंगळच्या श्री. बापूसाहेब गोखल्यांच्या सहवासांत, त्या सौ. गोखले झाल्यानंतरहि अनेक बैठकी ऐकल्या आहेत. नाटक सुरू करतांना प्रेक्षकांनी आपापल्या जागांवर येऊन बसावें म्हणून भूप रागांत नांदी गात असावेत असा माझा लहानपणीं समज होता. त्यामुळे बालवयापासूनच या रागावर माझा विशेष राग होता. पण पद्माबाईचा भूप ऐकल्यावर त्या रागाची जागा अनुरागाने घेतली आहे. त्यांची फिरत ऐकायची असली तर ती छोट्या ख्यालांतल्या चीजेंत ऐकावी. दोन वर्षांपूर्वीं नील सिटी हायस्कूलच्या दिवाणखान्यांत त्यांची गाजलेली बैठक अजूनहि माझ्या कानांत घुमत आहे. " इतना जोबनपर मान न करिये—" या शब्द-पंक्ति त्या आळवीत होत्या. ' मान ' या शब्दावरील समेच्या जागेवर किंवा ' करिये ' या शब्दानंतर तऱ्हेतऱ्हेच्या फिरकती, हरकती व खटक्याच्या ताना काढून त्या रसिकमनरंजन करीत होत्या.

पद्माबाईंची गायकी तडफदार आहे. धीम्या आलापीपेक्षा, चंद्रज्योतीसारख्या तनाईतींत त्या जास्त रंगून गातात. प्रत्येक आवर्तनांत नवनवीन रंग बदलण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. त्यांचा भूपराग विशेष आवडीचा असावा असें वाटतें. कारण सीताबर्डीवरील श्री. राजाभाऊ गर्गे यांच्या घरीं झालेल्या बैठकींतील भूप मला आठवतो. तीन वर्षांपूर्वी कलकत्त्यावरून ध्वनिक्षेपित झालेल्या तानसेन संगीत सभेंतील त्यांचा भूप मला आठवतो. त्यांच्या आधी वाजवून गेलेल्या बनारसच्या शांतालाल मिश्रने, तबल्यासारख्या मृतचर्माच्या वाद्यांतून ब्रह्मांड निर्माण केलें होतें. आणि त्या दिव्य वातावरणाला, ' सा रे ग प ध ' या पहिल्याच स्वरपंक्तीने आपलेसें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केलें होतें. बाबूराव देशमुखांच्या दिवाणखान्यांत रेडिओ ऐकत असलेले बालगंधर्व म्हणाले होते, " वा ! काय धैवत लागला आहे-वाऽ "

घरंदाज गायकीचा वारसा त्यांचेकडे वंशपरंपरा आला आहे. पण या वारसा-हक्कानेच त्यांनी नांव मिळविलें असें म्हणतां यायचें नाही. लहानशा बैठकींत, एखाद्या साधारण गायकापाशी चांगली चीज, हरकत सांपडली, तर लगेच कंठगत करण्या-साठी त्या धडपडतांना मी कित्येक वेळां पाहिलें आहे. नागपूरचाच एक जुना प्रसंग आठवतो. पद्माबाईचा नागपूरचा मुक्काम आटोपत आला होता. त्यानिमित्त नागपूरच्या तरुण गायकांचा एक छोटासा कार्यक्रम राजाभाऊ गर्गे यांचेकडे झाला होता. नागपूरचे तडफदार तरुण गायक श्री. प्रभाकर जोशी यांनी मध्यमांत आपलें एक आवडतें हिंदी पद म्हटलें होतें—

" मेरे सैंय्या उतरेंगे पार–नदिया तुम धीरे बहो—'

या पदावर त्या बेहद्द खूष होत्या. प्रियकर नदीपार जात आहे. तो सुखरूप पार जावा म्हणून प्रियतमेने नदीला वेगवेगळ्या प्रकारें विनविलें होतें. तूं थोडी हळूं वहा. माझा प्रियकर पार जाऊं दे "नदीबाई! तू माझ्यासारखी स्त्री...संभाळ माझ्या हिऱ्याला..."

ती आळवणी पद्माबाईंच्या मनांत ठसली. त्यांनी आपल्या मनांत स्वरलेखन केलें अन् ओळी आठवून पाठ करण्याचा प्रयत्न केला. नागपूरहून गेल्यावर, त्यांनी पत्र पाठवून श्री. जोशांकडून तें गीत नोटेशनसह मागवून घेतलें आणि त्यावर अनेक बैठकी त्यांनी झुलविल्या.

ख्याल गायनांत त्यांचा अधिकार कुणी नाकारूं शकत नाही. १९४१ सालांत नागपूर युनिव्हर्सिटी लॉ कॉलेजच्या नव्या इमारतीच्या उद्घाटन प्रसंगीं झालेल्या त्यांच्या कार्यक्रमांतला 'शंकरा' अजून मला आठवतो. "शंकर भंडार बोले" ही चीज अजून कानांत सळसळत आहे. इतक्या वर्षांनी असें वाटतें कीं पूर्वी ऐकलेल्या, या दिव्य स्वराकृतींना जर पुन्हा कर्णगोचर करण्याची युक्ति असती तर किती चांगलें झालें असतें. एखाद्या क्षणाचें महत्व असतें. रुचकर जेवणानंतर विडा जसा जमून जावा, त्याप्रमाणे एखादी चीज जमून जाते. पुन्हा तशी सर कधी यायची नाही. आणि खऱ्या रसिकाला तें माहीत असतें म्हणून असले चिरंजीव क्षण तो आपल्या नादब्रह्माच्या स्मृतिकप्यांत जमवून ठेवून देत असतो.

पद्माबाईचा रागदारीगायनांतला मोठेपणा सोडला तरी, रसिकांचें चित्त हलवि-ण्याचें कौशल्य त्यांनी अलीकडे एका वेगळ्या गानप्रकाराने आत्मसात केलें आहे. आमच्या महाराष्ट्रांत ठुंबरी थाटांत गावी पद्माबाईनीच! असें मीं म्हटलें तरी माझ्यावर अतिशयोक्तीचा आरोप येऊं नये. पूर्वीच्या ठुंबरी गायनापेक्षा अलिकडे गायकांच्या ठुंबरी गायनांत हजारो तऱ्हा दिसतात. विशेषतः लाहोरचे खाँसाहेब गुलामअली खाँ किंवा बर्कत अली खाँ यांच्या ठुंबरी गायनाने या अंगात एक विलक्षण माधुर्य आणून ओतलें आहे. "पंजाबी ढंग" या नावानें हा नवा साज ठुंबरीला चढला आहे. सिनेमांतल्या पंजाबी ढोलक्यांच्या गाण्यावरून ठुंबरीतल्या पंजाबी ढंगाची कल्पना यायची नाही. बडे-गुलाम अलींची," आये न बालम क्या करूं सजनी–' ही, किंवा "तेरे तिरछे नजर के मारे" हा दादरा ज्यांनी ऐकला असेल त्यांना पंजाबी ढंगातली कसरत कशी असते हें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समजेल. ही तऱ्हा पद्माबाईंनी इतकी आत्मसात केली आहे कीं, त्या ढंगाने आमच्या महाराष्ट्रीय गायकांनी ठुंबरी गायल्याचें माझ्या तरी ऐकिवांत नाही. पंजाबी ढंगाचें एक वैशिष्ट्य सांगता येईल; तें हें कीं ठुंबरीतील शब्द उच्चार मूळ उर्दूबर-हुकुम झाला तरच ही 'सलवार' त्या कमीजावर शोभून दिसते. नाहीतर चालता चालता पायघोळ अंगरख्यांत स्वतःचाच पाय अडकून अपशकून व्हायचा.

अशा लाडक्या थाटांत गाइलेल्या त्यांच्या अनेक ठुंबऱ्या मीं ऐकल्या आहेत. दोन वर्षांपूर्वी ललितकला मंडळांतला त्यांचा कार्यक्रम त्या दृष्टीने अविस्मरणीय आहे. "सजन नाही घर मोको विरहा सताये--" दर्दभऱ्या आवाजात त्यांनी ठुंबरीचें तोंड घेतांच, तबल्यावर बसलेल्या बाळासाहेब आठवल्यांनी लहानसा तुकडा फेकून 'सताये' वरील 'ता'-वर दिपचंदीचा सम घेतला होता, आणि त्या बरोबरच श्रोत्यांच्याहि चित्तवृत्ति चित्र झाल्या होत्या. एखाद्या वाऱ्याच्या संथ झुळुकेसरशी तृणपर्णांनी झोके घ्यावेत त्याप्रमाणे विरहाच्या उच्छ्वासांनी निर्माण झालेल्या खिन्नबोधर वातावरणांत श्रोते वहात होते. हृदयांतल्या दुःखद आठवणींचे कढ म्हणून जणूं बाळासाहेबांच्या हातांतला डग्गा धीरगंभीर स्वरात हुंकार देऊन ती कहाणी चालू ठेवण्याचा आग्रह करीत होता.

हिंदी काव्यांत 'सावन' मासाचा महिमा फार अगाध आहे. पावसाचे शिरवे सुरूं झाले म्हणजे त्या शीत तुषारांनी प्रियकराची आठवण जीवाला व्याकुळ करते. प्रियकर व्यापार-उदीमासाठी परगांवीं गेला असायचा. घरीं आपल्यासाठी कुणीतरी डोळे शिणवीत असेल, हें त्याच्या गावींहि नसायचें. त्याची रात्र कुणाच्या तरी मिठींत तर गेली नसेल ना अशी शंका तिला यायची, आणि मग व्याकुळ, आर्त स्वरांत ती म्हणते—'सजन नाहीं घर मोको विरहा सताये.' आणि दोनचार पावसाळे पाहिलेल्या, कळसाचें पाणी जिच्या अंगप्रत्यंगावर पडून गेलें आहे अशा एखाद्या वयस्क अनुभवी मैत्रिणीने धीर देताना जणूं म्हणावें, "हं ! खरं आहे बाई तुझं म्हणणं" तशी ती तबल्याची साथ ! गायनाच्या बैठकीचा रंगत ही एकट्या गायकावर किंवा त्याच्या साथीदारांवरच अवलंबून असते, असें म्हणतां यावयाचें नाही. एवढेंच कीं यशाचा बराचसा भाग त्यांचेकडे असतो. दोघांची समज जर नीट असली तर रंग कसा भरतो याची साक्ष म्हणजे त्या दिवशी बाळासाहेबांनी केलेली तबल्याची साथ. नरम कुठे वाजवावयाचें, उठाव कुठे यायचा, चौखुर उधळलेल्या अवलख घोड्यासारख्या परणानंतर एकदम समेवर येऊन, श्रोत्याकडून "वाऽ" कशी घ्यायची हें एक तबला वाजविणाऱ्याचें शास्त्र आहे. तें बाळासाहेबांना पूर्ण अवगत आहे. पद्माबाईंची ठुंबरी व त्याला त्यादिवशी बाळासाहेबांनी केलेली साथ ऐकतांना उरांत कुणीतरी विरहदुःखाच्या मधुर सुऱ्या खुपसाव्या पण सुख वाटावें तसें वाटे. पद्माबाईंच्या पूर्वीच्या ठुंबऱ्यांपैक्षा, त्या रात्रीं पंजाबी ढंगांनी विनटलेली त्यांची ठुंबरी जास्त परिणामकारक झाली. पूर्वी ती ठुंबरी त्या गात होत्या त्यावेळीं त्या कुमारी पद्मा शाळीग्राम होत्या. आणि आता सौभाग्यवती पद्मा गोखले होत्या. समोर त्यांचे पतिराज श्रीयुत बापुसाहेब गोखले बसले होते. आणि त्यांच्या उपस्थितींत, विरहाचा लटका रोष त्या व्यक्त करीत होत्या.—"मोको विरहा सताये—"

त्या विरही स्थितीचा अनुभव घ्यायला समोर पुण्याचे साहित्यिक कलावंत श्री. पु. ल. देशपांडे होते, तबला वादनपटु श्री. ठाणेदार होते, गायक वसंतराव

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देशपांडे होते, संगीत दिग्दर्शक मधुकर गोळवलकर होते, महाराष्ट्र-कोकिळ शंकरराव सरनाईक होते. आणि बाबूराव देशमुखांच्या उपस्थितीशिवाय तर ललित कला मंडळाची बैठक कधीच पूर्ण होत नसे. तो सर्व मंडळी मुग्ध झाली होती. सारे खूप बाळासाहेबांच्या साथीवर! पद्माबाई देखील मधेच एखाद्या लग्गीवर खूष होऊन म्हणायच्या 'वा! बाळासाहेब'—आणि ती ठुंबरी संपली तेव्हा बापूसाहेबांनी उठून बाळासाहेबांना धन्यवाद दिले. आजचा खरा रंग जमवला होता तबल्याने हें त्यांनी ओळखलें होतें. साथीने कधी कधी बैठकीची माती होते हें त्यांना माहित नव्हतें असें थोडेंच आहे? श्रोत्यांची उत्कंठा इतका वेळ ताणली होती ती एकदम सैल झाली. जवळजवळ अर्धा तास आपण श्वास घ्यायचा विसरून गेलों असें मला वाटलें म्हणून तृप्त भावनेने खूप मोठा श्वास घेतला अन् बाजूला पाहिलें, तों बाळासाहेब बक्षी, रुमालाने आपल्या डोळ्याच्या ओल्या कडा टिपीत होते. आनंदाच्या आणि दुःखाच्या असीम स्थितींतहि आसवें यावींत. कलेची थोरवी आणखी ती काय!

या ठुंबरीनंतर गाइलेल्या दादऱ्याने त्यांनी आपल्या गायकीचा आणखी एक पैलू दाखवून दिला. शंकरराव सरनाईकांचा मोहिद्दिनखाँ साहेबांच्या गायकींत रंगविलेला 'पानीभरेली कौन अलबेलेकी नार' हा दादरा जेवढा गोड, तेवढाच पद्माबाईंनी गाइलेला हा दादरा वेगळ्या ढंगाने नटलेला होता. शंकररावांची 'पानी भरेली नार' ही प्रौढ, गंभीर, वयस्क पण लज्जतदार अशी वाटत होती, तर पद्माबाईंची ही 'झमाझम' करणारी नार षोडशा, विजलीसारखी चमचम करणारी, क्वचित् येणाऱ्या जाणाऱ्याच्या अंगावर खट्याळ अवखळपणे थंड पाण्याचे शिडकावे मारणारी पोर होती. पाणी भरण्याचें निमित्त करून आपल्या डोळ्यांच्या कट्यारींनी दुसऱ्याच्या हृदयावर जखमा करणारी शिकारी होती. पै. फैय्याजखाँ साहेबांची "पानी भरणारी नार" शंकररावांच्या नायिकेहूनहि अधिक प्रौढ वाटावी अशी होती. ही दोघांच्या वेगवेगळ्या ढंगांनी गाइलेली चीज म्हणजे स्त्रीच्या जीवनातील दोन अवस्थांचें प्रतीकच होतें.

नंद रागांतली "अजहूँ न आये शाम" ही चीज आपण किती तरी वेळा ऐकली असेल. पण पद्माबाईंनी त्याच्या पुढच्याच ओळींत "बहुत दिन बीते रे—" या ओळींत आपली सर्व गानतपःश्चर्या ओतून ख्याल गायकींतली गंभीरता, ठुंबरी गायनांतली आर्तता आणि विरहिणीची व्याकुळता व्यक्त केली होती. विशेषतः पुष्कळच दिवस होऊन गेलेत, पण माझा शाम मला भेटत नाही या भावनेने खिन्न होऊन "बीते" नंतर 'रे' हा शब्द-प्रयोग त्या अशा हताश स्वरांत म्हणत की, प्रत्येकाला आपण स्वतः विरही गोपीच आहों असें क्षणभर वाटावें. त्या शब्दांतील शामची निष्ठुरता व्यक्त करणारी लकब मर्मांत शरासारखी जाऊन बसे. त्या एका ओळीसाठी हें पद माझ्या आठवणींत अमर आलें आहे.

—आणि भैरवी!!

परमेश्वराने प्रसन्न होऊन आपल्या शिष्याला त्याच्या दोन्ही हातांनी घेता येणार नाही इतकें देणें द्यावें त्याप्रमाणे भैरवी या रागिणीचें आहे. गायकाने ज्या कुवतीने आपली बैठक रंगविली असेल, त्या मगदुराप्रमाणे ही रागिणी त्याचे पुढे हात जोडून उभी राहाते. नाठाळ घोड्याचा दमछाक केल्यानंतर त्याला जसें वाकवावें तसा तो वाकतो, त्याप्रमाणे तापलेला गळा सातहि स्वरावर जसा वाकवावा तसा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५२
जुलै

वांकतो. गायकीची ही अप्रतिम कला दिसावी म्हणूनच जणू काय तेथील बैठकीत सगळ्यांत शेवटी योजना करण्यांत आली असावी. मनाच्या पूर्ण फुललेल्या भिवयाही शांत होतात, उमललेलीं कमळें मिटूं लागतात. चंद्राची किरण पुन्हा कलकलत संपणार असते. मनाच्या अशा अर्धोन्मीलित अवस्थेंत पद्मावतीबाईंनी "जमुना के तीर" ही चीज सुरूं केली. अन् ती चीज सुरूं होतांच माझे एक रसिक मित्र घरी जायला उठले. मी त्यांना हटकतांच, ते मला म्हणाले "मला भैरवी ऐकवत नाही, मला चांगली बैठक एवढ्या लवकर विसरवत नाही. माझ्यामनांत—'पानी भरनी नार' अजून एक वर्ष तरी घुमूं दे—"

पुण्यच पोटी घेऊन जन्माला आलेला कांही चिजांपैकी 'जमुनाके तीर' ही एक आहे. अब्दुल करीम खाँ साहेबांनी तिला रंगविली ती वेगळ्याच ढंगानें! सवाई गंधर्व आणि त्यांचे शिष्योत्तम श्री० भीमसेन जोशी यांचा रंग औरच! पद्मावतीबाईंनी ती अप्रतिम नखऱ्यानें म्हटली तीच ओळ पण म्हटल्यानंतर होणारा आविष्कार किती वेगळा! अब्दुल करीमखाँ किंवा सवाई गंधर्व यांच्यासारख्या ज्येष्ठ गायकांची, राधेला एकटी यमुना तीरावर जाऊं नको म्हणून सांगणारी सखी गंभीर, प्रौढा, नयनाचे तीर लागून घायाळ झालेली अशी वाटते. आपल्या वडीलकीच्या अधिकारांत ती भयसूचक वातावरण निर्माण करते. आपल्या धीरगंभीर आवाजांत जमुना तीरावर होणाऱ्या धोक्याचें वर्णन करीत असते आणि जणू तें वर्णन ऐकत असतांनाच राधेला झोप लागावी अशी तिची इच्छा असते. पण पद्मावाईंची राधा जणू अभिसार करायला नटून सजून निघाली असते. तिच्या देहावरून उतूं जाणाऱ्या लावण्यानें संध्यालीलेच्या वेळीं कुणीतरी घायाळ होईल म्हणून जपून जा असें सांगणारी मुग्धा—बाला असते. गंगेचा गोरा सखोलपणा नाही—पण यमुनेची चंचलता! भारतीय संगीतांत एकाच स्वरांची दोन स्वरूपें एकमेकासमोर येऊं नयेत असा संकेत आहे. परंतु या संकेताचा उथळपणाच व्यक्त करण्यासाठी जणू त्यांनी कोमल ऋषभ आणि शुद्ध ऋषभाची जोडी बांधून विलक्षण वातावरण निर्माण केलें. मध्येच कोमल गांधाराला षड्ज् कल्पून "अकेली मत जईयो, राधे" ही ओळ म्हणून, मध्यमावरून पंचम गांठून मूळ षड्जावर "तीर" म्हटल्या बरोबर बहुतेकांच्या तोंडातून 'वाहवा वाहवा' असे उद्गार बाहेर पडले. पंजाबी ढंगाने रंगविण्यासाठी, भैरवीसारखी दुसरी रागिणी नाहीं. गाणें आटोपल्यावर त्यांचे यजमान श्री० बापूसाहेब गोखले म्हणाले—"नागपूरचे रसिक श्रोते किती समजदार आहेत, मध्यंतरांत देखील उठत नाहींत—!"

हिंदविख्यात सतारवादनपटु श्री. रविशंकर ललितकला मंडळांतील कार्यक्रम आटोपल्यावरहि असेच म्हणाले होते—"नागपूरके रसिक लोग बहुत निचोड़ के सुनते हैं"

हा गौरव कुणाचा? नागपूरकर रसिकांचा की त्या कलावंताचा?

———

१९६१

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सूर्यास्त

जाति—पादाकुलक

★

'कर्मयोग' शिकवोनी जगता
अपुल्या जीवनगीतेमधुनी
कर्तृत्वाने हासत अपुली
जीवनयात्रा पुरी करोनी ॥१॥

जीवनमरणाऱ्याच संगतीं
बसलेल्या त्या पवित्र क्षेत्रीं
प्रभाकर कर्मयोगी अर्पी
निजप्राणांची बिल्वलपत्री ॥२॥

अस्तगिरीच्या रानामधलें
वेचोनीया स्वकरें सरपण
प्रभाकेराच्या मृतदेहास्तव
रचिलें कोणीं सुंदर सरण ? ॥३॥

उफाळलेल्या त्या ज्वालांची
फडफडते ती भगवी छाटी
विशाल निलसर आकाशाच्या
महार्णवाच्या पश्चिम कांठीं ! ॥४॥

सुतकीं वसनें नेसोनीया
खिन्न पातल्या सांजसावल्या
प्रेमालिंगन हळूहळू तें
सोडोनीया ज्वाला विझल्या ! ॥४॥

वाहुं लागला विषण्ण वारा
तळीं जळाच्या रक्षा विरली
देई काळोखाची स्वारी
नवताऱ्यांची ती तिलांजलि ! ॥६॥

आणि लाविल्या दहनभूवरी
शशीकरांच्या ऊदशलाका
प्रभाकराची घेउनि दीक्षा
विश्वासाठी फुले चंद्रिका ! ॥७॥

—भा. आ. पांढरीपांडे

क्षण अेक डहुळलें

★

मन तळ्याच्या कांठाशीं
अवचित येऊनीया
वांकवांकूनी पाहिला
तळ, ठाव घेऊनीया !
होती निभ्रांत शांतता
विसावल्या जळवंती
काठांवर अवाचित
तुला पाहून लाजती !
तुझी प्रतिमा हांसरी
थरकून मिसळली
लोभावल्या कांठावर
झेपावून हिसळली !
क्षण अेक डहुळलें
तळांतुन आल्या ऊर्मि
फेसाळुन उत्सुकता
मोहोरली रोमरोमीं !

—राजा मंगळवेढेकर

जीवन लहरी

★

— १ —

स्वप्नातुन जीवन हें
सुंदर जरि मज गमतें
कर्तव्यच जागेपणि
क्षणोक्षणीं पुकारतें
कर्तव्यच पुकारतें
सुंदरता बोलविते
रस्सीखेंच चाल्रतसे
ज्यास कधी अंत नसे !—

— २ —

निष्ठुर त्या यंत्रानें
कवितेला कुस्करलें
कुस्करल्या पाकळींत
मधुरगंध भरलेले
स्वप्नाळू मानस तें
स्वप्नीं रंग खेळले
काळावर मात करी
स्वप्न भंगुन उरलें !—

—योगेश्वर अभ्यंकर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भारतीय साम्ययोगाचा प्रजासूय यज्ञ

मधुसूदन अनंत चान्सरकर

★

आज भारतात कृषिविषयक अहिंसात्मक क्रान्तीचें युग नव्याने सुरू झालें आहे.

भूमिहीन शेतमजुराला जमीनीची भूक लागली आहे आणि दारिद्र्यांत जन्म पावलेल्या या भुकेच्या पोटीं भावी रक्तरंजित क्रान्तीचीं चिन्हें दृग्गोचर होऊं लागलीं आहेत. अशावेळीं भारताला, नास्तिकता आणि वर्गद्वेष फैलावणाऱ्या साम्यवादापासून वाचविण्याकरिता, महात्मा गांधींचे परमशिष्य पू. आचार्य विनोबा भावे यांनी अंतःप्रेरणेने भूमिदान यज्ञाचें पौरोहित्य स्वीकारलें आहे. जेव्हा राजा हा ईश्वराचा अवतार मानला जात असे अशा प्राचीन काळीं राजसूय यज्ञाचा परिपाठ आपल्या देशात रूढ होता. आज, जेव्हा राजाचे सर्व अधिकार प्रजेला प्राप्त झाले आहेत, तेव्हा आचार्य विनोबांनी आपल्या भू-दानाला प्रजासूय यज्ञ नामाभिधान दिलें, यात बदलत्या युगाचा साक्षात्कारच आहे. आवश्यक अशा सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची जबाबदारी आजच्या युगात राज्यकर्त्यांपेक्षा प्रजेवरच अधिक आहे हाच अर्थ यांतून ध्वनित होत नाही काय ?

परन्तु शांतता प्रस्थापनेच्या उद्देशाने अंगिकारलेल्या या अभिनव प्रयोगाचा उद्देश केवळ भूमिहीनांना भूमीचें दान करणें हाच नाही. हा केवळ प्रारंभ आहे. कसेल त्याची जमीन या न्यायानुसार शेतमजूरांना भूमीची नाय्य मालकी मिळवून देणें हें जरी आजचें प्रमुख कार्य असलें तरी भूदान चळवळीमागचें तत्त्वज्ञान अधिक व्यापक आणि सर्वस्पर्शी आहे. प्रत्येक खेड्याचें गोकुळांत रूपांतर करणें हें या नूतन योजनेचें अंतिम ध्येय आहे आणि केवळ याच ध्येयपूर्तीसाठी विनोबांनी कांचनमुक्त समाजाची कल्पना जनतेसमोर मांडली. धनासुराला जलाग्नियोगाची दीक्षा देऊन त्याचा नाश करा व आपली खरी संपत्ती जी भूमि, आपलें जें पशुधन त्याचें संरक्षण करा असा उपदेश त्यांनी खेड्यांतील लोकांना केला. वस्तुविनिमयातील अडचणी दूर करण्याकरितां, विनिमयाचे एक माध्यम म्हणून, केवळ एक 'चिन्ह' म्हणून, ज्या मुद्रेचा प्रथम आविष्कार झाला, त्याच मुद्रेला आपण खरी संपत्ति समजण्याची चूक केली. म्हणूनच आजच्या कृत्रिम वर्ग-विग्रहाचा उगम झाला हें त्यांनी ताडलें. त्यावर उपाय म्हणून मुद्राभक्तिचा त्याग करून खऱ्या संपत्तीची वाढ होईल असें उत्पादक कार्य श्रमिकांनी अंगीकारलें पाहिजे असा जनतेला घणाघाती आदेश दिला. वित्तेषणतेचा त्याग व भारतीय साम्ययोगाचें जीवन या दोन प्रमुख गोष्टींचा संस्कार आपल्या अनेकविध समस्या सोडविण्यास आवश्यक आहे. मुद्रा हे

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केवळ साधन आहे. शक्य असल्यास त्याच्या सहाय्याने, अशक्य असल्यास त्याशिवाय, सहकार्याच्या भावनेची जोपासना करून, सबंध खेडें हें एक मोठें कुटुंब आहे या कल्पनेने, सामुदायिक मालकीची नवीन अर्थव्यवस्था स्थापन करणें हें भूदानाचें अंतिम लक्ष्य आहे. प्रचलित अनेक आर्थिक प्रश्नांचें तेंच एक उत्तर आहे.

आणि त्या दिशेने विनोबांनी आपली मंद गतीची पण ध्येयाकडे अचूक नेऊन पोहोचविणारी पायी यात्रा सुरू केली. पायी चालण्याने जेवढा भूमिस्पर्श होतो तेवढाच लोकस्पर्शहि होतो. या संस्पर्शी यात्रेंत त्यांना भारतीय खेड्यांचें सत्यदर्शन झालें. लोकांची नाडी त्यांनी पारखली आणि अनेक शतकांपासून आपल्या देशांत मुरत असलेल्या दारिद्र्याच्या रोगावर उपाय म्हणून सर्वोदयाची भू-दान योजना जनतेसमोर मांडली.

परन्तु लोकांनी मात्र साशंक व मिश्रभावनेनें या योजनेकडे पाहिलें. कांहींना ते भांडवलदारांचे कैवारी दिसले. इतर कांहींनी त्यांना साम्यवाद्यांचे हस्तक म्हणून संबोधलें. कांहींनी अर्थशास्त्राच्या सिद्धान्तानुरूप ही योजना अव्यवहार्य आहे असें म्हणून फेटाळून लावली. या मंद गतीने पुढील तीनशेंपेक्षा अधिक वर्षांत देखील ही योजना पूर्णपणे कार्यान्वित होणें अशक्य आहे असा इतर कांहींनी निर्वाळा दिला. कांहींची दृष्टि दूषित झाली होती. कांहींना क्रान्तीचीं स्वप्नें पडून घाई झाली होती.

कांहींनी मात्र भूदानाची योजना अधिक कार्यक्षम व हितकारिणी होण्याकरिता विधायक दृष्टीकोनांतून या नवीन योजनेवर टीका केली. अशा प्रकारच्या टीकाकारांत मध्यप्रदेशाचे माजी अन्न-मंत्री व भारतीय नियोजन समितीचे सदस्य श्री. रा. कृ. पाटील यांचा समावेश होतो. आपल्या कल्पना सेवापुरी येथील सर्वोदय सम्मेलनांत मांडताना, ही योजना विनोबांनी पांगळी झाली आहे असें त्यांनी प्रतिपादन केलें.

हा गंभीर इषारा देतांना त्याच्या मनांत मुख्य तीन गोष्टींबद्दल शंका होती. त्यापैकी पहिली गोष्ट म्हणजे पोषणक्षम क्षेत्राची. योजनेनुसार देण्यात येणारे एकूण सहा एकर जमीनीचें दान एका कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता अपुरें आहे व या लहानशा तुकड्यावर एका बैलजोडीचे श्रम देखील आर्थिक दृष्ट्या फार जास्त होतील. उत्पादनाकरिता आवश्यक असलेली पर्याप्त पुंजी एकतर अशा भूदेवांना मिळणें कठीण होईल व मिळालेलें कर्ज परत करणें त्यांना शक्य होणार नाही व म्हणून जमीनीचे हे नवे मालक पुन्हा कर्जबाजारी होतील आणि साहजिकच जमीनीची मालकी पुन्हा त्यांच्या धनकोकडे जाईल. दुसरें असें कीं याचा परिणाम म्हणून पिकांच्या लागवडीचा दर्जा कमी प्रतीचा राहील आणि सुयोग्य वाढ न झाल्यामुळे उत्पादनात खंड पडून अशी शेती व्यक्तिगत अथवा राष्ट्रीय हिताची राहणार नाही. तिसरा लक्षांत घेण्यासारखा मुद्दा त्यांनी असा उपस्थित केला कीं वाजवीपेक्षा अधिक लोक शेतीवर काम करूं लागतील व त्यामुळे खेड्यांतील अर्थव्यवस्थेस आवश्यक असलेलें लहान उद्योगधंद्यांचें अनेकत्व नष्ट होईल. आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने आपल्या देशांतील भूमीवर पडलेला लोकसंख्येचा दाब जितका कमी होईल तितका चांगला. व त्या दृष्टीने घरगुती उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणें आवश्यक समजलें जातें. परन्तु भू-दानाने कदाचित् हा उद्देश साध्य होणार नाहीं.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतर कांही जणांनी भूदानाचे दोष दाखवितांना असें म्हटलें आहे कीं मिळालेल्या दानापैकी अधिक जमीन पडीत असून जी कांही थोडीफार जमीन दानरूपाने उपलब्ध झाली आहे तिच्यामुळे भूमीच्या अंतर्विभाजन व अपखंडनाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा झाला आहे. आणि पुन्हा गरीबांना जर दानच करायचें असेल तर तें केवळ भूमिचेंच करून चालणार नाही. तर त्यांची शेती समृद्ध करण्याकरिता पशुदान, औजार-दान, पुंजी-दान इत्यादि अनेक प्रकारचें दान करावें लागेल. जोपर्यंत हें शक्य नाही तोपर्यंत भूदानाची योजना तात्त्विक दृष्ट्या कितीहि गोंडस असली तरी अव्यवहार्यच राहणार.

या सर्वप्रकारच्या टीकांना आचार्य विनोबा भावे यांनी वेळोवेळीं आपल्या भाषणांमधून उत्तरें दिलीं आहेत. चीन आणि जपानमधील उदाहरणें देऊन पोषण-क्षम क्षेत्रांबद्दल ६ एकर पर्याप्त आहेत असें त्यांनी पटवून दिलें आहे. आणि भारतांत त्यापेक्षा अधिक जमीनहि प्रत्येकाच्या वाट्याला येऊं शकत नाही. आणि त्यावर उपाय म्हणून त्यांनी सहकारी तत्वांचा पुरस्कार केला आहे. सहकारी पुंजी व सहकारी भूमि यांच्या सहाय्याने स्थापन केलेल्या सहकारी कृषीनेच भारतांतील कृषिविषयक प्रश्न सोडविले जातील हें आपलें ठाम मत त्यांनी अनेकदा बोलून दाखविलें आहे.

लोकसंख्येचा भार शेतीवर अधिक पडेल हें म्हणणें सुद्धा त्यांना तितकेसें तर्क-शुद्ध वाटत नाही. भूदानाने घरगुती उद्योगधंद्यांचा नाश झालाच पाहिजे हें कुठलें तर्कशास्त्र ? आणि पुन्हा हें भूमीचें पुनर्विभाजन फक्त त्याच लोकांमध्यें केलें जाईल कीं ज्यांना शेतमजुरीशिवाय उपजीविकेचें दुसरें साधन उपलब्ध नाही. त्यामुळे जो कसेल त्याची जमीन हें तर सिद्ध होईलच पण त्याबरोबरच घरगुती उद्योगधंद्यांचेंहि क्षेत्र वाढेल. कृषिविषयक सहकारापासून कदाचित खेड्यातील लहान उद्योगांतहि सहकार्याची भावना निर्माण होईल.

म्हणूनच टीकाकारांना या यज्ञामागची भूमिका ते समजावून घेण्याचा प्रथम आग्रह करतात. आज लोक पडीत जमिनी द्यावयास तयार झाले आहेत ना ? उद्या सकस देतील असा त्यांना दुर्दम्य आशावाद आहे. समन्वयाचा मार्ग हाच सर्वश्रेष्ठ मार्ग आहे असें ते नेहमी सांगत असतात. अपखण्डन व अंतर्विभाजन हे तात्पुरते असून सहकारी अथवा सामुदायिक शेतीने हा दोष दूर होईल असा त्यांचा विश्वास आहे. म्हणून राज्यकर्त्यांना या बाबतीत कायदा करायला लावणें व न केल्यास त्याकरितां सत्याग्रहासारखें शस्त्र उपयोगात आणणें या गोष्टींस त्यांचा विरोध आहे. जनतेवर अधिक श्रद्धा असल्यामुळे या महान् पुरोहिताने हा प्रश्न पक्षातीत ठेवून सेवापुरीच्या सर्वोदय संमेलनात सर्व पक्षोपपक्षांना आपुलकीने आमंत्रण दिलें व सरकार कायदा करो अगर न करो आपण मात्र २५ लाखाच्या भूदानाचा संकल्प करून या प्रश्नाचे आजवरचें व्यक्तिगत स्वरूप मोडून त्याला सामाजिक व राष्ट्रीय स्वरूप दिलें पाहिजे असें आग्रहाने प्रतिपादन केलें. त्यानुसार भूदान समित्या स्थापन झाल्या आहेत व कार्याला सुरुवात झाली आहे. निरनिराळ्या राज्यातील शासनांनी देखील भूदान विधेयकांना मान्यता देऊन हा प्रश्न अधिक सुकर करणें त्यांचे कर्तव्य ठरतें.

भूदान हा महान् व नवीनतम यज्ञ आहे..............................

 म्हणूनच हृदयपरिवर्तनाची किमया जवळ बाळगणाऱ्या या कृश, अर्धनग्न,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जादुगाराने लवकरच सर्व जगाचे डोळे आपल्याकडे आकर्षित करून घेतले आहेत. सैद्धान्तिक दृष्ट्या शिरोधार्य मानलेल्या सत्य आणि अहिंसा यासारख्या महान् तत्त्वांचा हा पहिला सामुदायिक प्रात्यक्षिक प्रयोग होय. भूमिसारखे बिकट प्रश्न शस्त्रबलानेच सुटूं शकतात या हिंसक तत्त्वप्रणालीचा प्रथम विरोध या प्रयोगाने केला आहे. क्रान्तीचीं बीजें गरीबांच्या झोपडीतच निर्माण होतात हें अनुभवी सत्य खोटें करून दाखवून श्रीमंत सुद्धा क्रान्तीचे पुढारी व म्हणून मानाचे मानकरी होऊं शकतात हा नवीन सिद्धान्त या प्रयोगाने प्रथम जगापुढे मांडला आणि वर्गद्वेषापेक्षा सहकार्यामेच व समन्वयाने सामाजिक उन्नति दीर्घकालीन स्वरूपाची होऊं शकते हें सत्य पुनश्च जनतेपुढे याच प्रयोगाने आणलें आणि त्याच दृष्टीने भूमिदानाचें मूल्यमापन आपण केलें पाहिजे. भूमिदानामागची पार्श्वभूमि ही असल्या प्रकारची आहे. अध्यात्मिक आसनावर स्थिर केलेला हा प्रयोग ' सर्वेऽत्र सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चिद् दुःखभाग् भवेत् ॥ ' हा आदर्श घेऊन केला जात असल्यामुळे त्याचें पावित्र्य द्विगुणित झालें आहे.

मी भिकारी याचितों

★

रम्य पेला आंतल्या रंग द्रवाचा
पाहुनी उन्माद दाटे अंतरंगीं
ज्ञात—हें पीयूष नोहे ! जाळणारा—
हा विषारी लोळ अग्नीचा सुरंगी !
झाकिती उन्माद डोळे जाणिवेचे
लाविला ओठास पेला मीं विषारी
जाळता हो घोट जेव्हा कंठनाळा
सौख्य वाटे—तोंच होई दाह भारी !
रोमरंध्रांतूनि येती उष्ण वाफा
पेटलें हें चित्त; झाली राख सारी !
देह चाले—प्रेत तें. कोठूनि आत्मा
भूत माझें देहधारी ! देहधारी !
मंगलाचें धाम आतां दूर गेलें—
ठाव मातें यापुढे लाभे स्मशानीं
—साउली पापी कदाचित् वा पडोनी
जायचें सौभाग्य कोणाचें जळोनी !
मी भिकारी याचितों आतां जगाला
पाप या झोळींत टाका आपुलालें
पुण्यवंतांनो ! तुम्हांला स्वर्ग लाभो—
तेवढें द्या श्रेय मातें—फार झालें !

—वसंत वऱ्हाडपांडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

श्री. ना. रा. शेंडे,
चिटणीस वि. सा. संघ
यां ज क डू न

जबलपूर येथील नवीन कार्यकारी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या नवीन कार्यकारी मंडळाची सभा जबलपूर येथे दि. ४-५ १९५२ रोजीं दुपारीं २॥ वा. महाराष्ट्र विद्यालयांत डॉ. शं. दा. पेंडसे यांचे अध्यक्षतेखालीं भरली.

या सभेंत खालील कामकाज झालें.

१. ठरावः—बँकेचे सर्व व्यवहार यापुढे नवीन कोषाध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे या करतील. या करिता बँकेंतील खातीं त्यांच्या नावें करण्यांत यावीं.

२. नवीन परीक्षा-समिती

संचालक—डॉ. वि. भि. कोलते

कार्यवाह—सौ. उषाताई कोलते

सभासद—प्रा. श्री. ना बनहट्टी; प्रा. दा. ल. अडोणी; डॉ. मा. गो. देशमुख; प्रा. अ. ना. देशपांडे आणि श्री. दि. ह. सहस्त्रबुद्धे.

३. तिरोडा (जि. भंडारा) येथील एक साहित्यप्रेमी श्री. ब्रजकिशोर मिश्रा यांनी पांच वर्षांसाठीं दर वर्षाला अकरा रुपयांचें पारितोषिक देऊं केलें आहे. हें पारितोषिक 'विदर्भ साहित्य संघा'तर्फे होणाऱ्या 'साहित्य विनीत' परिक्षेंत जो हिंदी मातृभाषा असलेला विद्यार्थी गुणानुक्रमे पहिला येईल त्याला देण्यांत येईल. या पारितोषिकाला मान्यता देण्यांत आली.

४. 'युगवाणी'च्या संपादकमंडळावरील सभासदांची नियुक्ति करण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यांत आला.

५. संघलेखक श्री. वसंत निनावे यांचा राजीनामा स्वीकृत करण्यांत येऊन कार्यालयाच्या सोयीप्रमाणे त्यांना मुक्त करण्यांत यावें, असें ठरलें.

नवीन संघलेखकाची नियुक्ति अध्यक्ष, सरचिटणीस व चिटणीस यांनी मिळून करावी.

६. 'युगवाणी' जून १९५२ पासून मासिक करण्यांत यावें व त्याचीं पृष्ठें सामान्यतः ३२ असावींत. 'युगवाणी'च्या छपाईसंबंधीं निविदा (टेंडर) मागवून संपादक व सरचिटणीस यांनी निर्णय घ्यावा, असें ठरलें.

वि. सा. संघाच्या कार्यालयाकडून झालेलीं कांहीं कामें

(अ) जबलपूर अधिवेशनांत मंजूर झालेला व 'युगवाणी'च्या जून १९५२ च्या अंकांत प्रसिद्ध झालेला ठराव नं. ७ प्रधानमंत्री ना. पं. रविशंकरजी शुक्ल, अर्थमंत्री ना. ब्रिजलालजी बियाणी आणि शिक्षणमंत्री ना. पु. का. देशमुख यांचेकडे अम्मलबजावणीसाठी विनंतीपूर्वक पाठविण्यांत आला.

(आ) सर्व नाट्यसंस्थांना वि. सा. संघाच्या मंदिरनिधीला मदत करण्याविषयी आणि सीमारेषेवरील संस्थांना मराठी शिक्षणासंबंधी तक्रारी पाठविण्याविषयी विनंती करणारी खालील दोन पत्रकें सरचिटणीस श्री. ह. ना. नेने यांनी प्रसिद्ध केलीं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पत्रक नं. १

मराठी शिक्षणासंबंधींच्या तक्रारी पाठवा

विदर्भ साहित्यसंघाच्या जबलपूर येथे नुकत्याच झालेल्या अधिवेशनांत (ता. ३, ४, ५, मे १९५२) पुढील महत्वाचा ठराव सर्वानुमते संमत झालेला आपण 'युगवाणी'च्या जून १९५२ च्या अंकांत वाचलाच असेल:—"हिंदी आणि मराठी विभागसीमारेषेवरील बहुसंख्य लोकांची मातृभाषा मराठी असलेल्या जिल्ह्यांमधून प्राथमिक शिक्षण पूर्णतया मराठींतून देण्याची आणि दुय्यम शाळांतून मराठी माध्यमांतून घेण्याची सोय असावी, या दृष्टीने प्रांतांतील सर्व भागांची पाहाणी करून योग्य अधिकाऱ्यांकडून या संबंधींच्या तक्रारी दूर करून घेण्यासाठी ही सभा पुढील कार्यकर्त्यांची एक समिती नेमीत आहे. (१) प्रा. डॉ. शं. दा पेंडसे; (२) श्री. पु. य. देशपांडे; (३) श्री ग. त्र्यं. माडखोलकर; (४) डॉ. पंजाबराव देशमुख; व (५) डॉ. वि. भि. कोलते."

समितीच्या सभासदांना या कामीं मदत व्हावी, म्हणून विभागसीमारेषेवरील त्या त्या संस्थांनी व जनसेवा करणाऱ्यांनी, मराठीसंबंधी आपआपल्या भागांत असणाऱ्या तक्रारी वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यालयाकडे पुराव्यासह त्वरित पाठवाव्या, अशी त्यांना नम्र विनंति आहे. समितीचें कार्य सुरू झालें आहे.

पत्रक नं. २

विदर्भ साहित्य मंदिराच्या निधीला मदत करा

विदर्भ साहित्यसंघाच्या विनंतीला मान देऊन नाटकांवरील करमणुकीचा कर, मध्यप्रदेश सरकारने, सहानुभूतीचें धोरण स्वीकारून, रद्द केला आहे, ही गोष्ट नाट्यप्रेमी संस्थांना व नाट्यप्रेमी जनतेला विश्रुत आहेच. वरील कर रद्द करून नाट्यसंस्थांच्या मार्गातील एक महत्त्वाची अडचण आपल्या मध्यप्रदेश सरकारने दूर केली आहे, एवढेंच नव्हे, तर अप्रत्यक्षपणे नाट्यकलेला उत्साहित करून जनतेला उपकृत केलें आहे. म्हणून विदर्भ साहित्यसंघाला आनंद वाटतो. आता यापुढील प्रगतीचें महत्त्वाचें पाऊल म्हणजे विदर्भसाहित्यसंघाच्या जागेंत मराठीच्या विविध कार्यांना, सभांना व नाट्यप्रयोगांना उपयोगी पडेल असें सोयीचें, विस्तृत व प्रशस्त मंदिर उभारण्याची योजना हातीं घेणें, हें होय. हें मंदिराचें कार्य मूर्त स्वरूपास लवकर आल्यास नाट्यप्रेमी संस्थांना आपापले नाट्यप्रयोग करण्यास उत्कृष्ट स्थान लाभून, नाटकाचा खर्चहि बेताचा होईल; व त्यामुळे नाटकांचे प्रयोग वरचेवर करण्यास अवसर मिळून, नाट्यकलेची सेवा करण्याची उत्कृष्ट संधि मिळेल. यासाठी मध्यप्रदेशांतील सर्व नाट्यसंस्थांना अशी सप्रेम विनंति करण्यांत येते की, या नाट्यसंस्थांनी आपापल्या संस्थेतर्फे एखादा तरी उत्तम नाट्यप्रयोग करून त्याचें उत्पन्न विदर्भ साहित्यमंदिराच्या निधीला अवश्य द्यावें; व वि. सा. संघाला सक्रिय मदत करावी. या कामीं सर्व नाट्यसंस्थांचें सहकार्य मिळेल अशी वि. सा. संघाला प्रबळ आशा आहे.

क्षमस्व

याच अंकांत पृ. १५८ वरील "मुक्तोक्तमानस" या ग्रंथाचें परीक्षण प्रा. भवानीशंकर पंडित यांचें आहे. त्यावर नजरचुकीने नांव घालावयाचें राहिलें.

संपादक "युगवाणी"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ